CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शनिवार, ६ डिसेंबर २०२५ । वर्ष ३ रे अंक २७६ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com



**विनम्र अभिवादन**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाणदिन.

## विचारपुष्प



धर्मस्थापनेसाठी भगवंत आले तर कोणाची मदत करतील? ते सज्जनांची मदत करतील. त्यासाठी आपल्याला सज्जन व्हायचे आहे. जो समाजातील दुःख पाहून स्वतःहून पुढे येतो. दुःख निवारणासाठी प्रयत्न करतो तो सज्जन होय.

**- मदनदास देवी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह



## २१ डिसेंबरलाच होणार मतमोजणी

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

राज्यात २ डिसेंबरला झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायतीचा निकाल २१ डिसेंबरलाच लागणार आहे. नागपूर खंडपीठाने ३ डिसेंबरचा निकाल पुढे ढकलण्याचा निर्णय दिला होता. हायकोर्टाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यानंतर आज सुप्रीम कोर्टात याबाबत सुनावणी झाली. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने हायकोर्टाचा निर्णय कायम ठेवत २१ डिसेंबरलाच मतमोजणी करण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे निवडणूक लढवलेल्या उमेदवारांना २१ डिसेंबरपर्यंत निकालाची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

## भारत-रशिया अतूट मैत्रीचा नवा अध्याय

# १६ करारांवर स्वाक्षरी

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

गेल्या दोन दशकांपासून सुरू असलेली भारत आणि रशिया यांच्यातील मैत्री आणखी घट्ट झाली आहे. भारताच्या दौऱ्यावर असलेले रशियाचे अध्यक्ष ब्लादिमर पुतिन हे २३ व्या भारत-रशिया शिखर परिषदेत सहभागी झाले. दोन्ही नेत्यांनी विविध क्षेत्रांतील एकूण १६ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. तसेच दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंध, व्यापार, संरक्षण क्षेत्रात सहकार्य आणि जागतिक मुद्यांवर चर्चा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातील द्विपक्षीय चर्चेनंतर, दोन्ही बाजूंनी संयुक्त निवेदनात संबंध मजबूत करण्याचा आणि दहशतवादाविरुद्ध संयुक्तपणे लढण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. भारत-रशियात झालेल्या कराराची माहिती देताना परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले, आजच्या चर्चेत भारत आणि युरेशियन इकॉनॉमिक युनियनमधील प्रस्तावित मुक्त व्यापार करारावरही भर देण्यात आला, यामुळे भारताची व्यापार तूट भरून निघेल. आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉरसह कनेक्टिव्हिटी उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. या कॉरिडॉरमुळे आर्थिक संबंध मजबूत होतील, वाहतूक वेळ कमी होईल, तसेच व्यापार विस्तारण्यास मदत होणार आहे.

दोन्ही देशांनी मध्य पूर्वेतील शांतता, इराण अणुप्रश्न आणि गाझामधील मानवतावादी परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली. आरोग्य, व्यापार, संरक्षण आणि प्रसारण यासारख्या क्षेत्रात सहकार्यासाठी १६ सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. हे करार दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक मजबूत करतील आणि विविध क्षेत्रात भागीदारीला चालना देतील. करारांमध्ये ऊर्जा, स्थलांतर, आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण, अन्न सुरक्षा, जहाजबांधणी, रसायने आणि खते यासारख्या प्रमुख मुद्यांचा समावेश आहे.

**अणुभट्टीसाठी इंधनाचा पुरवठा करणार**

**२०३० पर्यंत आर्थिक सहकार्यासाठी नवीन धोरण**

**लघु अणुभट्ट्या आणि तरंगत्या अणुऊर्जा प्रकल्प बांधकामासाठी सहकार्य**

**२०३० पर्यंत १०० अब्ज अमेरिकन डॉलर्स व्यापाराचे लक्ष्य**

**रसायनांच्या पुरवठ्यावर सहमती**

**रशियन नागरिकांना ३० दिवसांचा मोफत ई-व्हिसा**



### भारताला इंधन पुरवठा सुरूच ठेवणार : पुतिन

बैठकीनंतर संयुक्त पत्रपरिषदेत बोलताला राष्ट्राध्यक्ष पुतिन म्हणाले, रशिया कोणत्याही दबावाशिवाय भारताला इंधन पुरवठा सुरूच ठेवणार आहे. सुरक्षा, अर्थव्यवस्था, व्यापार आणि संस्कृती या क्षेत्रात आमचे संबंध सतत मजबूत करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. दहशतवादाच्या लढ्यात रशिया भारतासोबत काम करणार आहे. आम्हाला द्विपक्षीय व्यापार दरवर्षी १०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याची आशा आहे. दोन्ही देश त्यांच्या राष्ट्रीय चलनांमध्ये व्यापाराकडे वाटचाल करत आहेत आणि सध्या ९६ टक्के व्यवहार अशा प्रकारे केले जातात.

### भारत-रशिया मैत्री ध्रुवताऱ्यासारखी : मोदी

पंतप्रधान मोदी म्हणाले, गेल्या आठ दशकांमध्ये जगाने अनेक चढ-उतार पाहिले. या सर्व काळात, भारत-रशिया मैत्री ध्रुवताऱ्यासारखी राहिली. परस्पर आदर आणि खोल विश्वासावर आधारित हे नाते नेहमीच काळाच्या कसोटीवर उतरले आहे. भारत-रशिया आर्थिक भागीदारीला नवीन उंचीवर नेणे हे आमचे प्राधान्य आहे. आम्ही २०३० पर्यंत आर्थिक सहकार्य कार्यक्रम सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली आहे. भारत आणि रशिया युरेशियन आर्थिक संघासोबत मुक्त व्यापार करार लवकर पूर्ण करण्याच्या दिशेने काम करत आहेत.

# आता कर्ज होणार स्वस्त

## आरबीआयकडून व्याजदरात कपात ईएमआयही कमी होणार

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

रिझर्व्ह बँकेने पुन्हा एकदा रेपो दर ०.२५ टक्क्यांनी कमी केला आहे. या निर्णयामुळे कर्ज घेणे स्वस्त होणार असून ईएमआय कमी होणार आहे. आता रेपो दर ५.२५ टक्के एवढा असेल.

रेपो दर कपातीचा निर्णय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीत घेण्यात आला. मागील तीन दिवसांपासून पतधोरण समितीची बैठक सुरू होती. यासंदर्भात रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी माहिती दिली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच ज्या दराने बँकांना कर्ज देते, त्याला रेपो दर म्हणतात. जेव्हा रेपो दर कमी करते, तेव्हा बँकांना स्वस्त कर्ज मिळते आणि ते हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवतात. म्हणजेच, आगामी काळात गृह आणि वाहन यांसारखी कर्जे ०.२५ टक्क्यांपर्यंत स्वस्त होतील.

ताज्या कपातीनंतर २० वर्षांच्या २० लाखांच्या कर्जावरील ३१० रुपयांपर्यंत कमी होईल. त्याचप्रमाणे ३० लाखांच्या कर्जावरील ईएमआय ४६५ रुपयांपर्यंत कमी होईल. नवीन आणि सध्याच्या दोन्ही ग्राहकांना याचा फायदा मिळेल.




**यंदा चारवेळा रेपो दरात घट**

आरबीआयने फेब्रुवारीमध्ये झालेल्या बैठकीत व्याज दर ६.५ टक्क्यांवरून ६.२५ टक्क्यांपर्यंत कमी केले होते. पतधोरण आढावा समितीकडून ही कपात सुमारे पाच वर्षांनंतर करण्यात आली होती. दुसऱ्यांदा एप्रिलमध्ये झालेल्या बैठकीतही व्याज दर ०.२५ टक्क्यांनी कमी करण्यात आला. जूनमध्ये तिसऱ्यांदा दरांमध्ये ०.५० टक्क्यांनी कपात झाली. आता पुन्हा एकदा यात ०.२५ टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. म्हणजेच, पतधोरण आढावा समितीने तीन वेळा व्याज दर १.२५ टक्क्यांनी कमी केले.

महागाई दर कमी असला तरी बाजारातील मागणी कायम राहावी आणि पैसा खेळता रहावा, या उद्देशाने आरबीआयने हे पाऊल उचलले आहे. *(वृत्तसंस्था)*

### रिझर्व्ह बँक रेपो दर का वाढवते आणि कमी करते?

कोणत्याही मध्यवर्ती बँकेकडे (सेंट्रल बँक) धोरणात्मक दराच्या (पॉलिसी रेट) स्वरूपात महागाईशी लढण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे. जेव्हा महागाई खूप जास्त असते, तेव्हा मध्यवर्ती बँक धोरणात्मक दर वाढवून अर्थव्यवस्थेतील पैशाचा प्रवाह (मनी फ्लो) कमी करण्याचा प्रयत्न करते. धोरणात्मक दर जास्त असल्यास, बँकांना मध्यवर्ती बँकेकडून मिळणारे कर्ज महाग होईल. त्या बदल्यात बँका त्यांच्या ग्राहकांसाठी कर्ज महाग करतात. यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचा प्रवाह कमी होतो. पैशाचा प्रवाह कमी झाल्याने मागणीत घट होते.

# क्रू मेंबर्स, वैमानिकांच्या सुट्ट्यांत बदल

**आठवड्यातून दोन दिवस सुटीचे निर्देश मागे** | **दिवसभरात इंडिगोची १००० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द** | **प्रवाशांना मनस्ताप आणि विमानतळांवर गोंधळ**

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

नवीन सॉफ्टवेअर प्रणाली बसविण्याची प्रक्रिया आणि कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे शुक्रवारी दिवसभरात इंडिगोच्या १००० पेक्षा जास्त विमानांना रद्द करण्याची नामुष्की कंपनीवर आली. ऐनवेळी विमाने रद्द झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल झाले. यावर उपाय म्हणून वैमानिक आणि क्रू मेंबर्सला आठवड्यातून दोन दिवस सुटी देण्याचा लागू केलेला निर्णय नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने अर्थात् डीजीसीएने शुक्रवारी मागे घेतला.

या निर्णयामुळे चार दिवसांत विमानांची विस्कळीत झालेली सेवा सुरळीत होणार असल्याचे इंडिगोच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. शुक्रवारी दिल्ली, बंगळूरु, पुणे, हैदराबादसह अनेक विमानतळांवर १००० हून अधिक विमानांची उड्डाणे रद्द झाली. अनेक विमानतळांवर प्रवाशांना २४ तासांपासून ताटकळत राहावे लागले. डीजीसीएने मागितलेल्या माहिती इंडिगोने कंपनीने वैमानिक, क्रू मेंबर्सला आठवड्यातून ४८ तास विश्रांती देण्याचा नियम आणि रात्रीला विमानांच्या उड्डाणांची संख्या सहावरून दोनवर करणे, तसेच रात्रीच्यावेळी विमानांच्या उड्डाणांवर घालण्यात आलेली मर्यादा या नियमांमुळे मनुष्यबळाचा तुटवडा निर्माण झाल्याचे म्हटले होते. याची दखल घेत डीजीसीएने १ डिसेंबरपासून लागू केलेले नियम काही काळासाठी मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार साप्ताहिक सुटी दिली जाणार आहे. तसेच या निर्णयामुळे विमान वाहतूक सुरळीत होईल, असे कंपनीने म्हटले आहे. दरम्यान, काँग्रेसने हा मुद्दा संसदेत उपस्थित केला असता या सर्व प्रकारांची चौकशी करण्यात येईल, असे उत्तर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिले. *(वृत्तसंस्था)*



**इंडिगो संकटामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल**

वृत्त पान ३

### कंपनीने मागितली जाहीर माफी

इंडिगो कंपनीने निवेदन जारी करून शुक्रवारी प्रवाशांची माफी मागितली आहे. त्यांनी म्हटले की. गेल्या काही दिवसांत प्रवाशांना सहन करावी लागलेली गैरसोय आणि मनस्ताप याची दखल घेण्यात आली आहे. तसेच सेवा पूर्ववत करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहे. सर्व प्रभावित प्रवाशांना तिकीटांचे शुल्क त्यांच्या खात्यात वळते केले जाईल आणि त्यात कुठलीही कपात केली जाणार नाही.

# पंढरपुरात अवैध वाळू उत्खनन; ५२ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

## उपविभागीय कार्यालय, पंढरपूर शहर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ डिसेंबर-**

पंढरपूर येथे अवैधरित्या वाळू उत्खनन केल्याप्रकरणी ५२ लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. यामध्ये जेसीबी, टिपर, वाळू, एक स्विफ्ट कारचा समावेश आहे. उपविभागीय कार्यालय व पंढरपूर शहर पोलिसांनी ही कारवाई केली.

याबाबतचे वृत्त असे की, इसबावी येथील ५२ एकर परिसरातील मोकळ्या मैदानात झुडुपाच्या आडोशाला काही अंतरावर भीमा नदीच्या वाळूचा अवैध साठा केल्याची माहिती एका खबऱ्याकडून उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांना मिळाली होती. त्यानुसार पोहेकॉ नीलेश रोंगे, पोना विनोद शिंदे व पोकॉ शिवशंकर हुलजंती आदींच्या पथकाला तिकडे धाडण्यात आले. या पथकाने तेथे जावून माहिती घेतली असता त्याठिकाणी रेकी करणेकरिता एक लाल रंगाची चारचाकी स्विफ्टकार आणि वाहनाच्या शेजारी दोन, तीन माणसे उभे असल्याचे दिसले. थोड्या वेळाने एक टिपर त्या ठिकाणी आला आणि जेसीबीच्या सहाय्याने त्यामध्ये वाळू भरायला सुरूवात केली. दरम्यान, कुणीतरी टेहळणी करत असल्याचे लक्षात आल्याने जेसीबी ड्रायव्हर, टिपर ड्रायव्हर वगळता इतर दोघेजण रेकी करणाऱ्या लाल रंगाच्या चारचाकी स्विफ्टकारमधून पळून जात होते. तेव्हा, पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला. परंतु त्यांनी वाहन न थांबवता पळून गेले. इतर पोलिसांनी जेसीबी व टिपर ड्रायव्हरला पकडले. काही वेळाने पंढरपूर शहर पोलिस ठाणेकडील पोसई पिसाळ, पोकॉ धनाजी मुटकुळे, पोह विनोद चौगुले यांनी पाठलाग करून लालरंगाची स्विफ्ट कार पकडत त्या चालकासह अन्य एका इसमास पकडले.

सिध्दनाथ भागवत इंगोले (रा.गादेगाव) महेश तानाजी शिंदे (रा.इसबावी), हनुमंत धनाजी जाधव (रा. वाखरी), परमेश्वर महादेव माने (रा.बोहाळी, ता.पंढरपूर) अशी त्यांची नावे आहेत. यातील तीन जणांना ताब्यात घेतले असून इतरांचा शोध सुरू आहे. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली नीलेश रोंगे, विनोद शिंदे, शिवशंकर हुलजंती, राहुल लोंढे, पिसाळ, धनाजी मुटकुळे, विनोद चौगुले यांनी ही कामगिरी बजाविली. पुढील तपास पोसई श्रीकांत घुगरकर हे करीत आहेत.

## मंदिरातील देणगी ही देवाची मालमत्ता

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

मंदिरात अर्पण केलेला प्रत्येक रुपया देवाची मालमत्ता आहे आणि तो कोणत्याही सहकारी बँकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी वापरला जाऊ शकत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

न्यायालयाने केरळमधील अनेक सहकारी बँकांच्या याचिका फेटाळून लावल्या आणि उच्च न्यायालयाचा तो आदेश कायम ठेवला, ज्यात तिरुनेल्ली मंदिर देवस्वम्‌ला मंदिराची जमा रक्कम दोन महिन्यांच्या आत परत करण्यास सांगितले होते. सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनाने या प्रकरणाची सुनावणी केली. बँकेच्या वतीने सांगण्यात आले होते की, अचानक दोन महिन्यात एवढी मोठी रक्कम परत करणे कठीण आहे. त्यामुळे बँकेला अडचण होईल. न्यायालयाने सांगितले की, हा निधी सुरक्षित आणि विश्वासार्ह राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवला पाहिजे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






पुतिन यांचे राष्ट्रपती भवनात आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू. याप्रसंगी पुतिन यांना विशेष सुरक्षा पथकाकडून मानवंदना देण्यात आली

# युक्रेन संघर्षात भारत शांततेच्या बाजूने

## पुतिन यांच्यासमोर पंतप्रधान मोदींनी मांडली भूमिका

**नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

भारत युक्रेनविरोधातील युद्धात तटस्थ नाही, तर आम्ही शांततेच्या बाजूने आहोत. मी अनेक जागतिक नेत्यांशी चर्चा करत असताना आमची भूमिका वेळोवेळी मांडत आलो आहे. भारत-रशिया संबंध अधिक दृढ होऊन त्यांनी नवी उंची गाठली आहे. दहशतवाद हा मानवतेच्या मूल्यांवर हल्ला आहे आणि रशिया आणि भारत एकत्रितपणे त्याविरुद्ध लढणार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी संयुक्त पत्रपरिषदेत बोलताना म्हणाले.

भारताच्या दौऱ्यावर असलेले रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे शुक्रवारी सकाळी राष्ट्रपती भवनात २१ तोफांच्या सलामीने स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांना गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू, पंतप्रधान मोदी उपस्थित होते. त्यानंतर पुतिन राजघाटावर गेले आणि त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली. २३ व्या भारत-रशिया शिखर परिषदेत सहभागी झाल्यानंतर दोन्ही नेत्यांची पत्रपरिषद झाली. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत सुरुवातीपासूनच युक्रेन मुद्यावर शांततेच्या बाजूने आहे. जगाने आता शांततेच्या मार्गावर परतले पाहिजे आणि आम्ही शांततेच्या प्रत्येक प्रयत्नांना पाठिंबा देऊ. भारत आणि रशिया यांच्यात फार पूर्वीपासून अनेक आघाड्यांवर सौहार्दपूर्ण संबंध राहिले आणि आता त्याला नवी चालना मिळाली आहे. पुतिन यांच्या नेतृत्वात सर्व परिस्थितीत आमचे संबंध नवीन उंचीवर नेले आहेत. या खोल मैत्रीबद्दल आणि भारताप्रती असलेल्या अढळ वचनबद्धतेबद्दल मी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचे आभार मानतो. रशियामध्ये



नुकतेच दोन नवीन भारतीय वाणिज्य दूतावास उघडण्यात आले आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांमध्ये संपर्क सुलभ होईल आणि जवळीक वाढेल.

**मोदींना रशिया भेटीचे निमंत्रण**

राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी पंतप्रधान मोदी यांना पुढीलवर्षी रशिया येथे होणाऱ्या भारत-रशिया शिखर परिषदेसाठी आमंत्रित केले. या परिषदेत मोदी यांच्या उपस्थितीने द्विपक्षीय संबंधांना पुढे नेण्याची नवी संधी मिळेल. *(वृत्तसंस्था)*

### भारत-रशिया झालेले महत्त्वाचे करार

१. भारत आणि रशिया संयुक्तपणे युरियाचे उत्पादन करणार
२. भारतीय कामगारांना रशियात रोजगार मिळणार, वेतनाचे नियम लागू होणार
३. अनियमित स्थलांतर रोखण्यासाठी दोन्ही देशांत सामंजस्य करार
४. आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि विज्ञान क्षेत्रात सहकार्यावर सहमती
५. अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण आणि मानव कल्याण देखरेखीसाठी करार
६. जहाज तज्ज्ञांना प्रशिक्षण, बंदरे, नौकायानाच्या आधुनिकीकरणासाठी मदत
७. रसायनांचा पुरवठा, संयुक्तपणे निर्मिती यासाठी रशियाची भारताला मदत
८. वस्तू, वाहनांच्या व्यापारासाठी नियम शिथील, माहितीच्या देवाणघेवाणीत सहकार्य
९. भारताच्या दळणवळण मंत्रालयाच्या टपाल विभाग आणि जेएससी रशियन पोस्ट यांच्यात द्विपक्षीय करार
१०. पुणे येथील संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्था आणि फेडरल स्टेट ऑटोनॉमस उच्च शैक्षणिक संस्था यांच्यात शैक्षणिक सहकार्यावर सामंजस्य करार
११. मुंबई विद्यापीठ, लोमोनोसोव्ह मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटी आणि रशियन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट फंड यांच्यात सहकार्य
१२. प्रसार भारती, रशियन फेडरेशन यांच्यात कार्यक्रमाच्या प्रसारणासंदर्भात सहकार्य
१३. रशियाच्या सरकारी मालकीची अणुऊर्जा कंपनी रोसाटॉमकडून कर्नाटकच्या कुडनकुलम येथील अणुऊर्जा प्रकल्व उभारणीसाठी मदत
१४. रशिया भारतात सहा अणुभट्ट्यांच्या बांधकामासाठी मदत आणि अणुभट्टीसाठी इंधनाचा पुरवठा करणार
१५. भारत आणि रशिया विद्यार्थी आणि खेळाडूंचे आदानप्रदान वाढवतील आणि प्रशिक्षणासाठी सहकार्य करणार
१६. कौशल्य विकासासाठी एकत्र काम करणार आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासाठी मदत करणार

# मेळघाटात सचिवाने घेतली झाडाझडती

## स्थानिक कर्मचाऱ्यांशी साधणार संवाद

**चिखलदरा, ५ डिसेंबर**

बालमृत्यू, कुपोषण व मातामृत्यूने पुन्हा मेळघाटचे नाव चर्चेत आले. उच्च न्यायालयात दाखल याचिकेवरून शासनाची कानउघाडणी केल्यावर प्रमुख विभागांचे प्रधान सचिव शुक्रवारी मेळघाटात दौऱ्यावर होते. त्यांनी चिखलदरा व धारणी तालुक्यातील विविध भागांचा दौरा केला. प्राथमिक व उपजिल्हा रुग्णालयांना भेटी देत अंगणवाडी, आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांनी झाडाझडती घेतली.

सचिवाच्या चमूने प्रामुख्याने ग्रामीण रुग्णालय चिखलदरा, प्राथमिक आरोग्य केंद्र काटकुंभ, ग्रामीण रुग्णालय चुरणी तसेच महिला व बालकल्याण विभागाचे प्रधान सचिवांनी बिहाली अंगणवाडी केंद्र डोमा, जरिदा राहू, हतरू, कुलंगणा खुर्द येथे भेटी दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्र टेब्रुसोंडा, सेमाडोह तर धारणी तालुक्यातील अनेक गावांमध्ये भेटी देऊन विविध विभागांची पाहणी केली. कुपोषण व बालमृत्यूचे कारण समजून घेतले तर आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची चौकशी केली. या दौऱ्याने मेळघाटच्या अधिकाऱ्यांमध्ये चांगली धडकी भरली होती. काही अधिकारांवर कारवाईची टांगती तलवार आहे. ८ डिसेंबरपासून अधिवेशन सुरू होणार असल्याने मेळघाटातील प्रश्न विधानसभेत गाजणार आहे. सचिवांच्या या दौऱ्यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव निपुण विनायक, आदिवासी विकास विभाग सचिव विजय वाघमारे, महिला व बालकल्याण विभाग सचिव अनुप कुमार यादव, विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांचा समावेश होता. मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू तसेच सॅम व मॅमची माहिती घेतली. आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रम शाळा व योजनांची स्थिती त्यांनी जाणून घेतली. अनेक ठिकाणी अनियमितता दिसून आली.



आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून माहिती घेताना सचिव

**स्थानिक कर्मचाऱ्यांशी संवाद**

अधिकाऱ्यांनी अंगणवाडी सेविका, आशा सेविका व स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी व सामाजिक कार्यकर्त्यांची संवाद साधत कुपोषण व बालमृत्यूचे कारणे समजून घेतली. *(तभा वृत्तसेवा)*

## अमृतपालची पुन्हा हायकोर्टात धाव

चंदीगड : पंजाबच्या खडूर साहिब लोकसभा मतदारसंघातून खासदार अमृतपाल सिंह पुन्हा एकदा पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयात पोहोचला आहे. त्याने स्वतःवर तिसऱ्यांदा लावण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षा कायद्याला आव्हान दिले आहे. त्याने पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. त्याच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, हे पूर्णपणे संवैधानिक अधिकारांचे उल्लंघन आहे. अमृतपाल सिंह २०२३ पासून तुरुंगात आहे. त्याने न्यायालयात युक्तिवाद केला आहे की, सरकारने कोणतेही नवीन कारण नसताना त्याची कोठडी वाढवली आहे. तसेच, ज्या प्रकरणांच्या आधारावर सरकारने त्यांचा वाढवला आहे, त्यात त्याची थेट भूमिका नाही. याचिकेत असाही युक्तिवाद करण्यात आला आहे की, काही घटना तर त्यावेळी घडल्या, जेव्हा तो दिब्रुगड तुरुंगात होता.

### महत्त्वाचे

**समाज माध्यमच्या तपासणीनंतर मिळेल एच-१बी व्हिसा**

**वॉशिंग्टन डीसी** : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसा नियमांमध्ये कठोरता आणण्याचे आदेश दिले आहेत. एच-१बी अर्जदारांना त्यांचे सोशल मीडिया खाते सार्वजनिक करावे लागेल, जेणेकरून अमेरिकन अधिकारी अर्जदाराचे प्रोफाइल, सोशल मीडिया पोस्ट आणि लाइक्स पाहू शकतील. जर अर्जदाराची कोणतीही सोशल मीडिया ॲक्टिव्हिटी अमेरिकेच्या हिताच्या विरोधात दिसली, तर एच-१बी व्हिसा जारी केला जाणार नाही. एच-१बीच्या आश्रितांसाठी (पत्नी, मुले आणि पालक) एच-४ व्हिसासाठी देखील सोशल मीडिया प्रोफाइल सार्वजनिक करणे आवश्यक असेल. एच-१बी व्हिसासाठी सोशल मीडिया प्रोफाइलची तपासणी आवश्यक करण्याची ही पहिलीच वेळ आहे. नवीन नियम १५ डिसेंबरपासून लागू होतील.

**सायबर-हल्ल्यांपासून वाचवणारे क्लाऊडफ्लेअर पुन्हा डाऊन**

**न्यूयॉर्क** : वेबसाइट्सना सायबर हल्ल्यांपासून वाचवणारे क्लाउडफ्लेअर शुक्रवारी पुन्हा डाउन झाले. यामुळे झिरोधा, ग्रो, कॅनव्हा, डाउनडिटेक्टर, झूम, एंजल वन, अपस्टॉक्स यांसारखे अनेक प्लॅटफॉर्म प्रभावित झाले. कंपनीने सांगितले की, डॅशबोर्ड आणि एपीआयमध्ये समस्या आहे, या कारणाने अर्ध्या तासापर्यंत यंत्रणा ठप्प राहिली. यामुळे विनंत्या अयशस्वी झाल्या आणि वापरकर्त्यांना 'एरर मेसेज' दिसले. १८ नोव्हेंबरनंतरची ही दुसरी मोठी समस्या आहे. सर्व्हर डाउन झाल्याची माहिती देणाऱ्या डाऊनडिटेक्टर वेबसाइटवर २,१०० हून अधिक तक्रारी आल्या.

**पंजाब पोलिसांवर रील करण्यास बंदी**

**मोहाली** : पोलिस कर्मचाऱ्यांकडून सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अयोग्य व्हिडिओ आणि रील्स पोस्ट करण्याच्या वाढत्या घटना लक्षात घेता, पंजाब पोलिसांनी कठोर मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. अलिकडे काही पोलिस कर्मचारी गणवेशात डान्स, भांगडा आणि मनोरंजक व्हिडीओ बनवताना दिसले होते, ज्यामुळे विभागाची प्रतिमा मलिन झाली. यावर डीजीपी कार्यालयाने सर्व रेंजचे आयजी, डीआयजी, पोलिस आयुक्त आणि जिल्ह्यांच्या एसएसपींना निगराणी वाढवण्याचे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

**विम्यासाठी वडिलांनी घडवून आणली मुलाची हत्या**

**मुरादाबाद** : विमा दाव्याच्या लोभापायी एका वडिलांनी आपल्या मुलाची हत्या घडवून आणली. स्वतःच्या मुलाला मारण्यासाठी वडिलांनी भाडोत्री मारेकऱ्यांना साडेतीन लाख रुपयांची सुपारी दिली. हत्या केल्यानंतर संपूर्ण घटनेला अपघाताचे स्वरूप देण्यासाठी मृतदेह मुरादाबादमध्ये रस्त्याच्या कडेला फेकून दिला. मृत्यू झालेला तरुण अनिकेत शर्मा संभलचा रहिवासी होता. त्याच्या नावावर २.१० कोटी रुपयांचा अपघाती विमा होता. मुरादाबाद पोलिसांनी या संपूर्ण गुन्ह्यात सहभागी असलेल्या अनिकेतच्या वडिलांना आणि तिन्ही भाडोत्री मारेकऱ्यांना अटक केली आहे. या गुन्ह्याची पटकथा लिहिणाऱ्या अमरोहा येथील वकिलाचा आणि त्याच्या साथीदाराचा पोलीस शोध घेत आहेत.

**गुजरातमध्ये १७ लाखांहून अधिक मृत मतदार आढळले**

**नवी दिल्ली** : गुजरातमध्ये सुरू असलेल्या स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (एसआयआर) मधून असे समोर आले आहे की, राज्याच्या सध्याच्या मतदार यादीत अजूनही १७ लाखांहून अधिक मृत मतदार समाविष्ट आहेत.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८५,७१२.३७ (+४४७.०५) |
| निफ्टी | २६,१८६.४५ (+१५२.७०) |




### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२८,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,७७,६०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३0.0 | २५.५ |
| अमरावती | २९.८ | १३.७ |
| भंडारा | ३०.० | १२.० |
| बुलडाणा | २८.५ | १४.४ |
| चंद्रपूर | २९.८ | १३.६ |
| गडचिरोली | २८.२ | १३.२ |
| गोंदिया | २७.१ | १०.४ |
| नागपूर | २७.८ | १०.८ |
| वर्धा | २८.० | १२.४ |
| वाशीम | २९.० | १२.८ |
| यवतमाळ | २९.० | १२.२ |

# राष्ट्रीय महामार्गावर उभ्या ट्रकला ट्रॅव्हल्सची धडक; महिला प्रवासी ठार

## देवरी तालुक्यात धोबीसराड येथील घटनेत १९ जखमी

**गोंदिया, ५ डिसेंबर**

राष्ट्रीय महामार्गावर उभ्या ट्रकला खाजगी प्रवासी बसची धडक बसून प्रवासी महिलेचा जागीच मृत्यू तर १९ प्रवासी जखमी झाल्याची घटना शुक्रवारी रात्री १२.३० वाजताच्या सुमारास देवरी तालुक्यातील धोबीसराड गावाजवळ राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर घडली. सुनीता हेमलाल बघेल असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. यात बस चालक व क्लिनरसह ९ प्रवासी गंभीर झाले असून १० प्रवासी किरकोळ जखमी झाले आहे. सर्व गंभीर जखमींना उपचारासाठी गोंदिया व रायपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. इतर जखमींवर देवरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ट्रॅक चालक दिनेश शिवदास टेकाम याने ट्रकमधील इंधन संपल्याने राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ वर धोबीसराड शिवारात उभा केला होता. मात्र, ट्रकचे इंडिकेटर किंवा कोणतेही संकेत सूचक सुरू ठेवले नसल्याने मागून येत असलेल्या खाजगी प्रवासी बसचा चालक चंद्रशेखर चौधरी यास महामार्गावर उभा असलेला ट्रक दिसला नाही. त्यामुळे उभ्या ट्रकला बसची जोरदार धडक बसली. यात सुनीता बघेल यांचा जागीच मृत्यू झाला तर चालक चंद्रशेखर चौधरी व क्लिनर मुकेश ठाकूर यांच्यासह भरत पटेल, राजकुमार निषाद, कृष्णा ठाकूर, नीलकमल यादव, आनंदिया राजेश पटेल, अरुण हेमलाल बघेल, मधू नरेश बंधे असे ९ प्रवासी गंभीर जखमी झाले. बसमधील इतर १० प्रवासीही किरकोळ जखमी झाले. मध्यरात्रीच्या सुमारास प्रवासी झोपेत असताना ही घटना घडली. प्रत्यक्षदर्शींनी घटनेची माहिती देवरी पोलिसांना दिली. यावेळी पोलिस निरीक्षक प्रवीण डांगे यांनी ताफ्यासह घटनास्थळ गाठून गावकऱ्यांच्या मदतीने जखमी प्रवाशांना बसच्या बाहेर काढले. सर्व जखमींना देवरी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. यात ९ गंभीर जखमी प्रवाश्यांपैकी तिघांना छत्तीसगड राज्यातील रायपूर येथे तर ६ प्रवाश्यांना गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. घटनेची नोंद देवरी पोलिसांनी केली असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मुकेश राठोड करीत आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

## कोळसा खाणविरोधातील आंदोलन पेटले

**अंबिकापूर, ५ डिसेंबर**

छत्तीसगडच्या सुरगुजा जिल्ह्यात एका ओपन-कास्ट कोळसा खाणीच्या विस्ताराला विरोध करत ग्रामस्थांच्या गटाने आंदोलन पुकारले. हे आंदोलन इतके तीव्र झाले की, आंदोलक आणि पोलिस यांच्यात संघर्ष झाला. आंदोलकांनी दगडफेक केल्यामुळे यात ३० पेक्षा अधिक पोलिस कर्मचारी जखमी झाले, या संघर्षात काही ग्रामस्थही जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी, बिश्रामपूर परिसरातील परसोडी कला गावातील रहिवासी कोळसा इंडियाची उपकंपनी असलेल्या साऊथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या (एसईसीएल) अमेरा कोळसा प्रकल्पाच्या विस्ताराला विरोध करत आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

## कार-ट्रकच्या धडकेत चार विद्यार्थ्यांचा मृत्यू

**अमरोहा, ५ डिसेंबर**

उत्तर प्रदेशातील अमरोहा जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकला कारने धडक दिल्याने चार वैद्यकीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गजरौला येथील श्री वेंकटेश्वर विद्यापीठापासून सुमारे सात किलोमीटर अंतरावर असलेल्या राजबपूर पोलिस स्टेशन परिसरातील अत्रासी गावाजवळ बुधवारी रात्री हा अपघात झाला. हे विद्यार्थी पार्टी करून सेडानमधून परत येत असताना चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ती कार गाद्यांनी भरलेल्या ट्रकला मागून धडकली. *(वृत्तसंस्था)*

# इस्रायलच्या हल्ल्यात १२ पॅलिस्टिनी ठार

## हमासचे अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी बॉम्बचा मारा



**गाझा, ५ डिसेंबर**

हमासच्या अड्ड्यांना लक्ष्य करीत इस्रायली लष्कराने जमिनीवरून कारवाई करीत बॉम्ब हल्ले केले, त्यात १२ पॅलिस्टिनी नागरिक ठार झाले, तर २५ जण जखमी आहे. हल्ल्याच्या वृत्ताला दुजोरा देत इस्रायलने म्हटले की, रफाह, खान युनूससह विविध भागात हमासचे दहशतवादी बोगद्यात लपलेले असून, त्यांचे अड्डे नष्ट करण्यासाठी कारवाई केली जात आहे.

गाझाच्या आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इस्रायली लष्कराने बुधवारी रात्री मध्य गाझातील विविध भागात हल्ले चढविले. त्यात अनेक निवासी इमारती, शाळा, निर्वासितांच्या छावण्या उद्ध्वस्त झाल्या. बचावपथकाने ढिगाऱ्यातून १२ नागरिकांचे मृतदेह बाहेर काढले, त्यात चार मुले, तीन महिलांचा समावेश आहे.

याशिवाय २५ जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले. युद्धबंदीनंतरही सुरू असलेल्या हल्ल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. प्रत्युत्तरात हमासनेदेखील इस्रायली सुरक्षा दालावर गोळीबार केला, त्यात पाच जवान जखमी आहे. खान युनुसच्या पश्चिमेकडील अल-मावासी येथील कुवैती फील्ड हॉस्पिटलजवळील निर्वासित छावणीवर इस्रायली लष्कराने हल्ला केला. या हल्ल्यात पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती प्रशासनाने दिली.

मृतांमध्ये आठ आणि दहा वर्षांच्या दोन मुलांचा समावेश आहे. रुग्णालयाने दिलेल्या वृत्तानुसार, या हल्ल्यात ३२ जण जखमी झाले आहेत. इस्रायली लष्कराने निवेदन जारी करून म्हटले की, हमासच्या दहशतवाद्यांनी दक्षिण गाझा येथे त्यांच्या सैनिकांवर हल्ला केला, ज्यामध्ये पाच सैनिक जखमी झाले. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. *(वृत्तसंस्था)*

# दोन वाघांच्या झुंजीत एकाचा मृत्यू

## नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान परिसरातील घटना

**अर्जुनी मोरगाव, ५ डिसेंबर**

दोन वाघांच्या झुंजीत एका २ वर्षाच्या नर छाव्याचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवार, ४ डिसेंबर रोजी सकाळच्या सुमारास नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान परिसरात उघडकीस आली.

नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान अंतर्गत कालीमाती संरक्षण कुटी येथील वनरक्षक आणि संरक्षण मजूर यांनी पहाटेच्या सुमारास वाघांच्या डरकाळीचा आवाज ऐकला. दरम्यान, वन कर्मचारी गस्तीवर असताना त्यांना गवतामध्ये सदर वाघ जखमी अवस्थेत आढळला. क्षेत्र संचालक पीयूष जगताप, उपसंचालक प्रीतमसिंग कोडापे, विभागीय वनाधिकारी अतुल देवकर, उपविभागीय वनाधिकारी बाळकृष्ण दुर्गे, वनपरिक्षेत्राधिकारी प्रतिभा रामटेके यांनी पाहणी केली.



मृतावस्थेत आढळलेला वाघ

मृत छावा अंदाजे दीड ते दोन वर्षे वयाचा व १३० किलो वजनाचा नर वाघ असून त्याच्या मानेवर व डोक्यावर जखमा असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे त्याचा दुसऱ्या वाघासोबत झालेल्या झुंजीत मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

वन्यजीव विभागातर्फे बकी पर्यटन गेट परिसरात मृत वाघाची उत्तरीय तपासणी करून अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी एनटीसीए प्रतिनिधी म्हणून मानद वन्यजीव रक्षक मुकुंद धुर्वे, भीमराव लाडे, व्याघ्र प्रकल्पाचे कंत्राटी पशुवैद्यकीय अधिकारी मेघराज तुलावी आदी उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*

# एफ-३५ विमान कोसळले, वैमानिक सुरक्षित



**वॉशिंग्टन, ५ डिसेंबर**

दक्षिण कॅलिफोर्नियातील ट्रोना शहरापासून काही अंतरावर अमेरिकन वायुदलाचे एफ-३५ विमान अचानक कोसळले. तांत्रिक बिघाड झाल्याचे लक्षात येताच पॅराशूटच्या मदतीने वैमानिकाने उडी घेतली आणि तो या अपघातातून बचावला. वैमानिकाला किरकोळ दुखापत झाली असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

गुरुवारी स्थानिक वेळेनुसार सकाळी १०:४५ वाजता दक्षिण कॅलिफोर्नियातील वायुदलाच्या तळावरून विमानाने उड्डाण केले आणि उड्डाणाच्या अवघ्या पंधरा मिनिटांतच हा अपघात झाला. अपघातस्थळापासून ट्रोना विमानतळ तीन किमी अंतरावर होते. समाज माध्यमावर अपघाताची चित्रफीत प्रसारित झाली आहे. त्यात विमान वेगाने खाली येत असल्याचे आणि वैमानिक पॅराशूटच्या मदतीने बाहेर येत असल्याचे दिसून येत आहे. विमान जमिनीवर धडकताच मोठा स्फोट झाला आणि काळा धूर आकाशात पसरला. अमेरिकेच्या वायुदलाने अपघाताच्या वृत्ताला दुजोरा दिला असून प्राथमिक तपासात तांत्रिक बिघाडामुळे विमान कोसळल्याचे म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# इंडिगो संकटामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल

## लहान मुले-वृद्धांनी बेंचवर झोपून काढली रात्र





विमान रद्द झाल्याने सुरक्षा अधिकाऱ्यांशी वाद घालताना प्रवासी. ऐनवेळी विमान रद्द झाल्याचे सांगितल्यानंतर प्रवाशांना बाकड्यावर झोपून रात्र काढावी लागली

**◆ नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी असलेल्या इंडिगो एअरलाइन्समुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सलग चौथ्या दिवशी कंपनी गंभीर ऑपरेशनल समस्यांशी झुंजत असल्याने, दिल्लीतून होणारी सर्व देशांतर्गत उड्डाणे रद्द करण्यात आली.

इंडिगोच्या फ्लाइट्स सातत्याने रद्द होत असल्याने देशातील अनेक विमानतळांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी जमल्याचे पाहाया मिळत आहे. अचानक इतके प्रवासी जमल्यामुळे लहान मुले आणि वृद्धांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.

मुंबई, दिल्ली, बंगळुरू, हैदराबाद आणि पटना विमानतळांवर प्रवाशांना रात्र थंडीत जागून काढावी लागली. विविध विमानतळावरील फोटो सध्या समोर आले आहेत, ज्यात कडाक्याच्या थंडीत अनेकजण जमिनीवर, तर लहान मुले बेंचवर झोपल्याचे पाहायला मिळत आहे.

इंडिगो गेल्या तीन दिवसांपासून कर्मचारी आणि तांत्रिक समस्यांसारख्या गंभीर ऑपरेशनल अडचणींचा सामना करत आहे. याचा थेट परिणाम कंपनीच्या वेळेवर विमानसेवा देण्याच्या क्षमतेवर झाला आहे. या समस्येमुळे गुरुवारी कंपनीने एकाच दिवसात १००० पेक्षा जास्त उड्डाणे रद्द केली, ज्यामुळे त्यांची वेळेवर सेवा देण्याची क्षमता घसरून १९.७ टक्के इतकी नीचांकी झाली आहे. तर, शुक्रवारी ५ डिसेंबर रोजीही इंडिगो एअरलाइनला देशभरातून ६०० हून अधिक उड्डाणे रद्द करावी लागली आहेत. रद्द होणाऱ्या विमानांची ही संख्या जास्त असल्याने, प्रवाशांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### नेमकी समस्या आहे तरी काय?

डीजीसीएने १ नोव्हेंबरपासून पायलट आणि इतर क्रू मेंबर्सच्या कामाशी संबंधित नियमांमध्ये बदल केले आहेत. याला फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन (एफडीटीएल), असे नाव देण्यात आले आहे. हे दोन टप्प्यांत लागू करण्यात आले. पहिला टप्पा १ जुलै रोजी लागू झाला. तर, १ नोव्हेंबरपासून दुसरा टप्पा लागू झाला. नवीन नियमांनुसार प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी पायलट आणि क्रूला पुरेसा आराम देण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे एअरलाइन कंपन्यांकडे पायलट आणि क्रू मेंबर्सची अचानक कमतरता निर्माण झाली आहे. डीजीसीएने सांगितले की, नोव्हेंबरमध्ये इंडिगोची एकूण १,२३२ उड्डाणे रद्द करण्यात आली, ज्यात नियमांमुळे रद्द झालेल्या ७५५ उड्डाणांचा समावेश आहे.

### उपाशीच झोपावे लागले

अनेक पालकांनी सांगितले की फ्लाइट रद्द झाल्यानंतर त्यांच्या मुलांना उपाशीच झोपावे लागले. एअरलाइन्सकडून अन्न, पाणी किंवा कोणतीही मदत मिळाली नाही, अशी तक्रार मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. काही प्रवासी तर १५ ते २० तासांपर्यंत अडकले होते, परंतु फ्लाइटची नवीन वेळ किंवा रिफंडबाबत कोणतीही ठोस माहिती देण्यात आली नाही. वृद्ध, गर्भवती महिला आणि रुग्णांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागला.

# इंडिगोचे ५४ टक्के प्रवासी विलंब, कर्मचाऱ्यांच्या वर्तनामुळे त्रस्त

## एका वर्षात ६३ टक्के तक्रारी वाढल्या

**◆ नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

देशाच्या एअरलाइन मार्केटमध्ये ६० टक्के वाटा असलेल्या इंडिगोचे प्रवासी विमानांच्या वेळेवर उड्डाण न झाल्याने त्रस्त आहेत. त्यांच्या तक्रारी गेल्या एका वर्षात ६३ टक्के वाढल्या आहेत. लोकलसर्किल्सच्या एका सर्वेक्षणानुसार, इंडिगोमधून प्रवास करणाऱ्या ५४ टक्के प्रवाशांनी विमानांच्या उशिरा येण्याबद्दल आणि कर्मचाऱ्यांच्या खराब वर्तनाबद्दल तक्रारी केल्या आहेत.

### कर्मचाऱ्यांच्या वृत्तीबद्दल सर्वाधिक तक्रारी

- ☑ **१५,९३८ प्रवाशांनी १५ पैकी एकापेक्षा जास्त समस्यांची तक्रार केली**
- ☑ **५४ टक्के लोकांनी विमानाने वेळेवर उड्डाण न करणे ही मोठी समस्या असल्याचे सांगितले.**
- ☑ **५४ टक्के लोकांनी कर्मचाऱ्यांच्या वागणुकीबद्दल तक्रार केली.**
- ☑ **४५ टक्के लोकांना माहिती उशिरा किंवा अपूर्ण मिळाली.**
- ☑ **४२ टक्के लोकांनी सामान हाताळणीबद्दल तक्रार केली.**
- ☑ **३२ टक्के लोकांनी ग्राहक सेवेबद्दल नाराजी व्यक्त केली.**
- ☑ **२७ टक्के लोकांनी विमानाची गुणवत्ता आणि देखभाल खराब असल्याचे सांगितले. २३ टक्के लोकांनी खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबद्दल तक्रारी केल्या**
- ☑ **१४ टक्के लोकांनी मनोरंजन प्रणालीबद्दल तक्रारी केल्या आहेत.**
- ☑ **१९ टक्के लोकांनी इतर समस्या सांगितल्या.**

(वृत्तसंस्था)




# लष्करी अधिकाऱ्याकडून सुरक्षा परिस्थितीचा आढावा

**◆ जम्मू, ५ डिसेंबर**

उत्तरी लष्कराचे कमांडर लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी जम्मू-काश्मीरमधील पूंछ येथे सैन्य शिबिराला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी कार्यात्मक तयारीचा आढावा घेतला व सुरक्षा परिस्थितीचे मूल्यांकन केले.

आव्हानात्मक परिस्थितीत काम करणाऱ्या सैन्याच्या दृढ समर्पणाची आणि उच्च दर्जाच्या तयारीची प्रशंसा शर्मा यांनी केली. लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी गुरुवारी सेक्टरमध्ये तैनात असलेल्या युनिट्सच्या ऑपरेशनल तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी पुंछ येथील हरिबुधाला भेट दिली. त्यांना सध्याच्या सुरक्षा परिस्थिती व चालू असलेल्या दहशतवादविरोधी प्रयत्नांची सविस्तर माहिती देण्यात आली. यात वाढलेली देखरेख, जलद प्रतिसाद यंत्रणा, तंत्रज्ञान आणि कवायतींचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# रशियाचे युक्रेनवर हल्ले, ऊर्जा प्रकल्प उद्ध्वस्त

## ३६ क्षेपणास्त्रे, ६०० ड्रोनचा मारा, १५ लाख लोक अंधारात

**◆ कीव्ह, ५ डिसेंबर**

रशियाच्या वायुदलाने गुरुवारी रात्री युक्रेनची राजधानी कीव्ह शहरासह विविध भागात जोरदार हल्ले चढविले. ऊर्जा प्रकल्पांना लक्ष्य करीत काही तासात ३६ क्षेपणास्त्रे आणि ६०० ड्रोनचा मारा करण्यात आला. यामुळे वीज प्रकल्प आणि इंधन पुरवठा संयत्रांचे मोठे नुकसान झाले. या हल्ल्यात २० जणांचा मृत्यू झाला असून, ३५ नागरिक जखमी आहेत. ऊर्जा प्रकल्पांचे नुकसाना झाल्याने १५ लाख लोक अंधारात आहे.

युक्रेनच्या लष्कराने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, राजधानी कीव्ह, सुमीचा मोठा भाग असलेला खेरसन, खार्किव शहर आणि खार्किव प्रदेशातील विल्वा येथे रशियन सैन्याने ३६ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि ६०० ड्रोनने हल्ला केला. यामुळे अनेक प्रमुख वीज प्रकल्पांचे नुकसान झाले आहे आणि सुमारे १५ लोक अंधारात आहे. लष्करी तळावरील हल्ल्यांमुळे लष्करी क्षमता आणि नागरी पायाभूत सुविधांचेही नुकसान झाले. निवासी इमारतीच्या ढिगाऱ्यातून २० पेक्षा अधिक नागरिकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले, तर ३५ जखमींना रुग्णालयात भरती करण्यात आले. रशियाने हल्ल्यासाठी ऊर्जा पायाभूत सुविधा आणि लष्करी तळांना लक्ष्य केले. खेरसन आणि सुमी प्रदेशातील प्रमुख वीज सबस्टेशन आणि ट्रान्सफॉर्मर केंद्राला लक्ष्य करण्यात आले, ज्यामुळे संपूर्ण प्रदेशात वीजपुरवठा खंडित झाला. खार्किव्ह आणि त्याच्या आसपासच्या भागात वीजपुरवठा खंडित झाला, तसेच पाणीपुरवठा आणि मेट्रोच्या सेवा विस्कळीत झाल्या. (वृत्तसंस्था)



# सिमोन टाटा यांचे निधन

**◆ मुंबई, ५ डिसेंबर**

'वेस्टसाईड'च्या संस्थापिका आणि लॅक्मे ब्रॅण्ड जगभरात पोहोचविणाऱ्या सिमोन दुनोयर टाटा यांचे निधन झाले. त्या ९५ वर्षांच्या होत्या. सिमोन या रतन टाटा यांच्या सावत्र आई आणि नोएल टाटा यांच्या मातोश्री होत्या. त्यांनी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. स्वित्झर्लंडमध्ये जन्मलेल्या सिमोन यांनी भारतात येऊन केवळ टाटा कुटुंबातच स्थान मिळवले नाही, तर कॉस्मेटिक ब्रँड लॅक्मेला जागतिक स्तरावर नेले. सिमोन टाटा यांचा जन्म स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे झाला होता. त्यांचे पूर्ण नाव सिमोन नेव्हल दुनोयर असे होते. (वृत्तसंस्था)



## चित्रपट वार्ता

### अभिनेत्याने आई-वडिलांसाठी घेतली गाडी

**मुंबई** : मनोरंजन जगतातील तारे-तारका कायमच नवीन घर, गाडी खरेदी करतात आणि समाज माध्यमांवर त्याचे मोठमोठे फोटोही शेअर करतात. मात्र, मराठी सिनेजगतातील एक अभिनेता असाही आहे ज्याने आपल्या पालकांसाठी आलिशान गाडी घेतली आहे. तो अभिनेता म्हणजे संतोष जुवेकर. काही दिवसांपूर्वी तो 'छावा' चित्रपटामुळे चर्चेत होता. आता तो रंगभूमीवर 'घाशीराम कोतवाल' हे नाटक करत आहे. त्याने आपल्या आई-वडिलांसाठी आलिशान गाडी घेतल्याने त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. ह्युदई ऑरा ही आठ लाख रुपये किमतीची गाडी त्याने घेतली आहे. सुख आणि पुण्य म्हणजे काय जे ह्यांच्या डोळ्यात दिसतं....आई बाबा...माझे तुमच्यावर खूप प्रेम आहे, अशी भावना व्यक्त करत संतोषने गाडीचे फोटो आणि व्हिडीओ समाज माध्यमांवर शेअर केले आहेत.



### दिव्याने सासरचे नाव काढल्याने चर्चेला उधाण

**मुंबई** : लग्नाच्या २० वर्षांनंतर अचानक दिव्या खोसला कुमार हिने सासरचे आडनाव काढल्याने घटस्फोटाच्या चर्चेला उधाण आले आहे. दिव्याचे पती टी-सीरिजचे प्रमुख आणि चित्रपट निर्माते भूषण कुमार आहेत. दिव्याने नुकतेच आडनाव हटवण्याच्या मुद्यावर स्पष्टीकरण दिले. ती म्हणाली की, माझा घटस्फोट झालेला नाही, पण माध्यमांना तेच हवे आहे. आमचा घटस्फोट होण्याची ते वाट बघत आहेत. तिच्या या बोलण्यावरून नवऱ्याचे आडनाव हटवण्यामागे नेमके कारण स्पष्ट झालेले नसले तरी घटस्फोटाच्या निव्वळ अफवा आहेत, असा कयास लावला जात आहे. २००५ मध्ये दिव्या आणि भूषण कुमार यांचे लग्न झाले होते. दोन दशकांच्या संसारानंतर हे जोडपे विभक्त होणार, याच्या चर्चा सुरू होत्या. याविषयी सध्यातरी दोघांनी काहीही स्पष्ट केलेले नाही.



### पुतणी सिमर भाटियाच्या पदार्पणाबद्दल अक्षय भावुक

**मुंबई** : अक्षय कुमारची पुतणी सिमर भाटिया 'इक्कीस' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. सिमरच्या पदार्पणाबद्दल अक्षय खूप आनंदी आणि अभिमानास्पद वाटत आहे. अक्षयने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. अक्षयने इंस्टाग्रामवर इक्कीस चित्रपटातील सिमरचे पोस्टर शेअर करत लिहिले- तुला लहानपणी मांडीवर घेण्यापासून ते आता तुला चित्रपटांच्या दुनियेत पाऊल ठेवताना पाहणे, आयुष्यात खरोखरच एक वर्तुळ पूर्ण झाले आहे. सिमर, मी तुला एका लाजाळू मुलीपासून, जी तिच्या आईच्या मागे लपायची, एका आत्मविश्वासपूर्ण तरुण स्त्रीमध्ये बदलताना पाहिले आहे. जी कॅमेऱ्याचा सामना करण्यासाठी अशी तयार आहे जणू ती त्यासाठीच बनली आहे.



# असीम मुनीरला अमेरिकेत प्रवेशबंदी घाला

## ४४ अमेरिकन खासदारांचे परराष्ट्र मंत्र्यांना पत्र

**◆ वॉशिंग्टन, ५ डिसेंबर**

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी फील्ड मार्शल सय्यद असीम मुनीर यांची देशाचे पहिले संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्ती केली. या निर्णयाने मुनीर यांना राष्ट्रपतींच्या समांतर अधिकार मिळाल्याने हा लोकशाहीसाठी मोठा धोका असून, मुनीर यांना अमेरिकेत प्रवेशबंदी घालून त्यांची मालमत्ता गोठवा, अशी मागणी करणारे पत्र ४० हून अधिक अमेरिकन खासदारांनी परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांना पाठविले आहे.

मुनीर यांना लष्करप्रमुख आणि संरक्षण दल प्रमुख नियुक्त करण्याची पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केलेली शिफारस गुरुवारी राष्ट्रपती झरदारी यांनी मान्य केली. यामुळे पुढील पाच वर्षे एकाच वेळी दोन्ही पदांवर मुनीर कायम राहणार आहे. याविरोधात ४४ अमेरिकन खासदारांनी रुबियो यांना पत्र लिहून मुनीर हे लोकशाहीसाठा धोकादायक असून, त्यांना अमेरिकेत प्रवेश देऊ नये अशी मागणी केली. पत्रात पुढे म्हटले की, लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्या नियंत्रणाखालील पाकिस्तानी सरकार उघडपणे दडपशाही धोरणे राबवत आहे. लोकांचा आवाज दडपला जात आहे आणि लष्करी राजवटीला आव्हान देणाऱ्यांना तुरुंगात डांबले जात आहे. काही उच्चपदस्थ अधिकारीही या दडपशाहीत सामील आहेत. पाकिस्तान हुकूमशाहीच्या उंबरठ्यावर असून, यासाठी जबाबदार असलेल्या मुनीरसारख्या लोकांवर व्हिसा बंदी आणि मालमत्ता गोठवण्यासारखे उपाय करायला हवेत. पत्र लिहिणाऱ्यांमध्ये अमेरिकन काँग्रेस महिला प्रमिला जयपाल, रशिदा तालिब आणि ग्रेग कैसर यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)



### विरोध करणाऱ्यांचा अतोनात छळ

पत्रात म्हटले की, पाकिस्तानमध्ये हुकूमशाही अत्याचारांविरुद्ध बोलणाऱ्या अमेरिकन नागरिकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना धमक्या आणि छळाचा सामना करावा लागत आहे. त्यांना मनमानीपणे ताब्यात घेतले जात आहे. या घटना नागरी आणि राजकीय हक्क नियंत्रित करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करतात. लोकशाही संस्था आणि मूलभूत स्वातंत्र्ये पद्धतशीरपणे नष्ट केली जात आहेत.

# अब्दुल्ला खानला सात वर्षांचा तुरुंगवास

**◆ रामपूर, ५ डिसेंबर**

उत्तर प्रदेशातील रामपूर न्यायालयाने समाजवादी पक्षाचे नेते आझम खान यांचा मुलगा अब्दुल्ला आझम याला दोन पासपोर्ट प्रकरणात दोषी ठरवले असून, सात वर्षांचा तुरुंगवास आणि ५०,००० रुपयांचा दंड ठोठावला आहे. भाजपा आमदार आकाश सक्सेना यांच्या तक्रारीनंतर अब्दुल्ला आझम आणि इतरांविरुद्ध २०१९ साली कलम ४२० (फसवणूक), ४६७, ४६८ (बनावट ओळखपत्र) आणि ४७१ अंतर्गत खटला दाखल झाला होता.

आपल्या निर्णयात न्यायालयाने म्हटले की, बनावट कागदपत्रे समाज व राष्ट्रासाठी धोकादायक ठरू शकतात. अशा कागदपत्रांचा वापर गुन्हे, दंगे किंवा ओळख बदलण्यासाठी केला जाऊ शकतो. आजच्या सुनावणीला अब्दुल्ला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर झाला.

२०१९ मध्ये भाजपाचे तत्कालीन आमदार आकाश सक्सेना यांनी अब्दुल्ला आजम आणि इतरांविरोधात तक्रार दाखल केली होती. (वृत्तसंस्था)

# २००९ पासून अमेरिकेतून १८,८२२ भारतीय हद्दपार

## केंद्र सरकारने संसदेत दिली माहिती



**◆ नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

अमेरिकेने २००९ पासून एकूण १८,८२२ भारतीय नागरिकांना हद्दपार केले. यात जानेवारी २०२५ पासून हद्दपार केलेल्या ३,२५८ भारतीयांचा समावेश आहे, असे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी राज्यसभेत सांगितले.

पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना जयशंकर म्हणाले की, मानवी तस्करीच्या प्रकरणांची चौकशी राज्यांनी तसेच राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) केली आहे. यात पंजाबमध्ये सर्वाधिक प्रकरणे नोंदवली गेली आहेत.

२००९ पासून एकूण १८,८२२ भारतीय नागरिकांना हद्दपार करण्यात आले आहे. २०२३ मध्ये ६१७, २०२४ मध्ये १,३६८ भारतीयांना हद्दपार करण्यात आले, असे मंत्र्यांनी सांगितले. जानेवारी २०२५ पासून एकूण ३,२५८ भारतीय नागरिकांना हद्दपार केले आहे. यापैकी २,०३२ भारतीय (अंदाजे ६२.३ टक्के) नियमित व्यावसायिक उड्डाणांनी परतले आणि उर्वरित १,२२६ भारतीय (३७.६ टक्के) यूएस इमिग्रेशन अँड कस्टम्स एन्फोर्समेंट (आयसीई) किंवा कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शन (सीबीपी) द्वारे चालवल्या जाणाऱ्या चार्टर विमानांनी परतले, असे ते म्हणाले. पूरक प्रश्नांना उत्तर देताना जयशंकर म्हणाले की, एनआयएने काही वर्षांपूर्वी मानव तस्करी विरोधी सेलची स्थापना केली होती. राज्यांनी अशा प्रकरणांची चौकशीदेखील सुरू केली आहे. एनआयएने मानवी तस्करीच्या २७ प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदवले आहेत आणि तपास केला आहे, ज्यामुळे १६९ जणांना अटक करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# श्रीनगर, गंदरबल येथे एसआयएचे छापे

**◆ श्रीनगर, ५ डिसेंबर**

जम्मू-काश्मीर पोलिसांच्या राज्य तपास संस्थेने (एसआयए) शुक्रवारी 'व्हाईट कॉलर्ड मॉड्यूल' च्या चौकशीचा भाग म्हणून श्रीनगर व गंदरबल जिल्ह्यात छापे टाकले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मध्य काश्मीरमधील श्रीनगर व गंदरबल जिल्ह्यात एसआयएने पहाटे छापे टाकले, यात शहरातील बटामालू परिसरातील दियारवानी भागातील तुफैल भट याच्या निवासस्थानाचाही समावेश आहे, असे त्यांनी सांगितले. एसआयएने गत महिन्यात भट याला अटक केली होती. (वृत्तसंस्था)

# आई-वडील नसलेला पती हवा तर बायोडेटात लिहा!

**◆ बरेली, ५ डिसेंबर**

जर तुम्हाला कुटुंबासोबत राहायचे नसेल, तर लग्नाच्या बायोडाटामध्ये स्पष्टपणे लिहा की असा पती हवा आहे ज्याचे कोणीही नसेल, अशी टिप्पणी करत बरेलीतील कुटुंब न्यायालयाने एका शिक्षिकेची कानउघाडणी केली.

कुटुंब न्यायालयाचे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश ज्ञानेंद्र त्रिपाठी यांनी एका व्यावसायिकाची घटस्फोटाची याचिका मंजूर करताना ही टिप्पणी केली. २०२४ मध्ये बदायूं येथील शुभाशीषने कुटुंब न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल केली होती. कोर्टाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकले. पुरावे पाहिले आणि पती-पत्नीला वेगळे राहण्याचा निर्णय दिला. यावेळी एक महत्त्वाची टिप्पणी

**न्यायालयाची टिप्पणी | घटस्फोट मंजूर**

केली की, ज्या मुलींना लग्नानंतर फक्त पतीसोबत राहायचे आहे, त्यांनी आपल्या लग्नाच्या बायोडाटामध्ये स्पष्टपणे लिहावे की त्यांना असा जोडीदार हवा आहे, ज्याच्या घरी आई-वडील किंवा भावंडं नसतील. तो कुटुंबाच्या जबाबदारीतून मुक्त असावा. संयुक्त कुटुंबाला ओझे समजणे, सामाजिक रचनेसाठी समस्या निर्माण करणारी प्रवृत्ती आहे.

न्यायाधीश ज्ञानेंद्र त्रिपाठी म्हणाले, संभाषणातून हे स्पष्ट होते की विवाहितेला संयुक्त कुटुंबाचा तीव्र तिरस्कार होता. पतीने न्यायालयात सादर केलेल्या छायाचित्रांमध्ये, पत्नीने मंगळसूत्र, सिंदूर, जोडवी यांसारखी कोणतीही सौभाग्यचिन्हे परिधान केलेली नाहीत. लग्नाच्या एका वर्षानंतर तिने वैवाहिक संबंधही नाकारले.

न्यायाधीशांनी महाभारताचे उदाहरण देत म्हटले- असंख्य लोक मरतात, तरीही लोक विचार करतात की ते जिवंत राहतील. सध्या लोक वृद्धाश्रमांमध्ये आणि बंद फ्लॅटमध्ये एकटे जीवन जगत आहेत. विवाहिता एका प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे. जी व्यक्ती स्वतःच्या कुटुंबातील मूल्यांचा आदर करू शकत नाही, ती विद्यार्थ्यांना संस्कार कसे देईल. हा एक चिंताजनक प्रश्न आहे. (वृत्तसंस्था)



### कौटुंबिक मूल्यांना तडा

न्यायाधीशांनी निर्णयात लिहिले- विवाहितेच्या वडिलांनी मुलीला समजावण्याऐवजी वेगळे राहण्याची अट लादली. हा दबाव निंदनीय आणि वैवाहिक संस्थेच्या विरोधात वर्तन आहे. कौटुंबिक मूल्यांना कमकुवत करणाऱ्या अशा प्रकरणांमध्ये विधिमंडळानेही लक्ष दिले पाहिजे. न्यायाधीश म्हणाले की, जेव्हा पालकच मुलांना संयुक्त कुटुंबापासून दूर राहण्याचे शिक्षण देऊ लागतात, तेव्हा समाजात संतुलन बिघडणे निश्चित आहे.

## अग्रलेख...

# फडणवीसांची आश्वासक वर्षपूर्ती

विकासाची जाण आणि त्यासाठी लागणारी दीर्घदृष्टी असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारला एक वर्ष पूर्ण झाले आहे. राज्यातील महायुती सरकारच्या वर्षपूर्तीचा अर्थात एका वर्षाचा हा काळ खूप मोठा नसला तरी तो राज्याला विकासाच्या मार्गावर नेणारा आहे आणि त्यामुळेच राज्यातील जनतेला अतिशय समाधान देणारा असा म्हणावा लागेल. देवेंद्र फडणवीस यांचा मुख्यमंत्री म्हणून हा तसा दुसरा कार्यकाळ. याआधी २०१४ ते २०१९ या काळात फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाचा आपला पहिला पाच वर्षांचा कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केला. मध्यंतरी बरेच काही घडले. मग, मागील वर्षी पाच डिसेंबरला फडणवीस यांनी हजारो लोकांच्या उपस्थितीत मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. लोकनेता कसा असतो आणि कसा असावा, हे आपल्या कृतीतून फडणवीस यांनी सतत दाखवून दिले. २०१९ मध्ये पुन्हा एकदा फडणवीस मुख्यमंत्री होतील, असे सर्वांना वाटत होते. महाराष्ट्रातील मतदारांचा जनादेशही तसाच होता, पण काही अनपेक्षित राजकीय घडामोडींनी राजकारण बदलले. मुख्यमंत्रिपदापासून फडणवीस यांना दूर राहावे लागले. पण ते हताश आणि निराश झाले नाहीत. विरोधी पक्षनेते म्हणून नवी जबाबदारी पार पाडण्यासाठी फडणवीस सज्ज झाले आणि ती जबाबदारी त्यांनी अतिशय प्रभावीपणे आणि यशस्वीपणे पार पाडली. याचे कारण असे की, फडणवीस ज्या संस्कारातून आले, त्यात सत्ता हे साध्य नाही तर जनतेच्या सेवेचे साधन मानले जाते. त्यामुळे जनतेची सेवा करायला फडणवीसांसारख्या नेत्याला सत्तेची किंवा पदाची गरज नाही. सत्ता असेल तर सत्तेसह आणि सत्ता नसेल तर विरोधी पक्षात बसून जनतेची सेवा करायला फडणवीस यांच्यासारखे सुसंस्कृत नेते एका पायावर तयार असतात हे त्यांनी आतापर्यंत केलेल्या भूमिका सिद्ध करतात. राजकारणात येण्याच्या आधीपासून ते संघाचे स्वयंसेवक आहेत.

संघाने देशाला दोन पंतप्रधान दिले. योगायोगाने दोघेही कधीकाळी संघाचे प्रचारक होते. त्यामुळे पंतप्रधान म्हणून त्यांनी देशावर आपला ठसा उमटवला. देशात आतापर्यंत होऊन गेलेल्या इतर पंतप्रधानांचे काम आणि वाजपेयी-मोदी यांचे कार्य यातील फरक स्पष्ट दिसतो. एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदय या संकल्पनेचे वाजपेयी आणि मोदी हे दोघेही पाईक. अंत्योदय म्हणजे समाजातील शेवटच्या माणसाचे कल्याण. वाजपेयी आणि मोदी यांच्या सरकारची वाटचाल याच भूमिकेतून झाली आणि अजूनही सुरू आहे. वाजपेयी आणि मोदी यांना आदर्श मानूनच देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारची महाराष्ट्रातील वाटचाल सुरू आहे आणि अंत्योदय हे त्याचे उद्दिष्ट आहे. त्याचा अनुकूल परिणामही दिसून येत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कारकीर्दीचा हा टप्पा वाटतो तितका सोपा नव्हता. यात त्यांना अनेक आव्हानांचा आणि अडचणींचा सामना करावा लागला. राजकीय तडजोडीत उपमुख्यमंत्रिपदही स्वीकारावे लागले. जी व्यक्ती आपल्या मंत्रिमंडळात सहकारी होती, तिचे नेतृत्व मुख्यमंत्री म्हणून मान्य करताना, त्या मंत्रिमंडळात त्यांना उपमुख्यमंत्री व्हावे लागले. खरं म्हणजे हे राजकीय अवमूल्यन होते. पण फडणवीस यांनी पक्षाच्या आणि राज्यातील जनतेच्या व्यापक आणि दीर्घकालीन हितासाठी हा कडू घोट पचवला. काही वेळेला राजकारणात माघार घ्यावी लागते, संयम बाळगावा लागतो. तुमच्या राजकीय कल्पना स्पष्ट असतील, आपण राजकारणात कशासाठी आलो, याबद्दल मनात कोणताही संभ्रम नसेल तर अशा घटना दिलेरीने घेता येतात. फडणवीस यांनी तेच केले. ज्या पदावर बसले, ते पद त्यांनी मोठे केले. आता मुख्यमंत्रिपदाच्या दुसऱ्या कार्यकाळात देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा कायापालट सुरू केला आहे. खरं म्हणजे याची सुरुवात त्यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळातच केली होती. त्यावेळी त्यांनी विकासाची जी बीजे टाकली होती, त्यांचा आता डेरेदार वृक्ष झाला आहे आणि त्याला फळेही येत आहेत. मुख्यमंत्रिपदाची दुसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर फडणवीस यांनी बदल्याचे नाही तर बदलाचे राजकारण करण्याचा शब्द दिला होता. त्या शब्दाची पूर्तता त्यांनी केली. सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्रात आज जे बदल दिसून येत आहेत, त्याचे श्रेय त्यांना द्यावे लागेल. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेल्यानंतर फडणवीस यांनी राज्याच्या मागास, अतिमागास भागाकडे विशेष लक्ष दिले. गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वीकारले. या जिल्ह्याचे पालकमंत्री व्हायला अनेक नेते घाबरत होते, जबरदस्तीने पालकमंत्रिपद आले तर त्या जिल्ह्यात फिरकत नव्हते, चुकून जायची वेळ आली तर गडचिरोलीच्या बाहेर पडत नव्हते. पण ही परिस्थिती फडणवीस यांनी बदलली. गडचिरोलीचा विकास करायचा असेल तर त्या जिल्ह्यातील नक्षलवाद आटोक्यात आणला पाहिजे, संपवला पाहिजे, याची त्यांना जाणीव होती. त्या दिशेने त्यांनी पावले टाकली. नक्षलवाद संपवण्याच्या मोदी सरकारच्या आक्रमक धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली. त्यांच्या दिशादर्शी कामामुळे महाराष्ट्रातील विशेषत: गडचिरोलीमधील नक्षलवाद आज शेवटचे आचके देत आहे. नक्षलवाद्यांना शरण येण्याचे आवाहन करण्यात आले. याचा परिणाम दिसून आला. अनेक कुख्यात नक्षलवाद्यांनी फडणवीस यांच्या उपस्थितीत शस्त्रे खाली ठेवत आत्मसमर्पण केले. ज्यांनी आत्मसमर्पण करण्यास नकार दिला, त्यांना गोळ्या घालण्याचा अधिकार त्यांनी पोलिसांना दिला आहे.

यामुळे गडचिरोलीसारख्या खनिज संपत्तीचे भांडार असलेल्या जिल्ह्यात अनेक मोठे उद्योग आले आणि अजून येत आहेत. यातून आदिवासी तरुणांच्या हाताला बंदुका नाही तर रोजगार मिळाला. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आधीपासूनच आघाडीवर होते. ती आघाडी कायम आहे. राज्याचा जो औद्योगिक विकास झाला, त्यामागे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती हे एक कारण होते. आरोग्य आणि शिक्षण यात महाराष्ट्र तर देशात आधीपासूनच आघाडीवरचे राज्य होते. फडणवीस यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात विक्रमी परकीय गुंतवणूक आली. यातून महाराष्ट्रात अनेक मोठ्या औद्योगिक समूहांचे उद्योग आले. त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाले. तरुणांच्या हाताला काम मिळाले तर त्यांच्या हातात दगड आणि डोक्यात हिंसक विचार येत नाहीत.

फडणवीस यांच्या कार्यकाळात राज्यातील भ्रष्टाचार कमी झाला. मंत्र्यांना त्यांनी कामाला लावले. मंत्र्यांना आणि मंत्रालयांनाही लक्ष्य ठरवून दिले. एवढ्या दिवसांत एवढी कामे झाली पाहिजेत, असे बंधन घालून दिले. यातून मंत्र्यांसोबत प्रशासनातही जनतेप्रति उत्तरदायित्वाची भावना निर्माण केली. काँग्रेसच्या कार्यकाळात केंद्रापासून राज्यापर्यंतचे अनेक मंत्री जनतेला नाही तर काही मूठभर भांडवलदारांना उत्तरदायी राहात होते. त्यातून राज्यात अनागोंदी आणि भ्रष्टाचार वाढला होता. या सर्वांना फडणवीस यांनी आळा घातला. 'न खाउंगा न खाने दूंगा', या मोदींच्या पावलावर पाऊल टाकत फडणवीस यांची वाटचाल सुरू आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या कार्यकाळात सुरुवातीला देवेंद्र फडणवीस काहीसे नवखे होते. त्यामुळे प्रशासनावर पाहिजे तशी पकड बसवायला त्यांना वेळ लागला. आता मात्र प्रशासनरूपी नाठाळ घोड्याला फडणवीस यांनी वठणीवर आणले आहे. प्रशासनरूपी घोड्यावर त्यांची मांड पक्की बसली आहे. आता प्रशासन त्यांची फसवणूक करू शकत नाही, त्यांना चुकीचा सल्ला देऊ शकत नाही. फडणवीस उच्चशिक्षित आहेतच; शिवाय जनमानसावर त्यांची पकड आहे. भविष्यातील दमदार नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांनी महाराष्ट्र सर्व क्षेत्रांत पुढे जावा यासाठी काम केले व करीत आहेत. महाराष्ट्राच्या या घोडदौडीचे कारण फडणवीस यांच्या नेतृत्वात, कर्तृत्वात आणि वक्तृत्वात आहे. त्यामुळेच राजकारणात लंबी रेस का घोडा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. देवेंद्र फडणवीसांसारखा नेता महाराष्ट्राला मुख्यमंत्री म्हणून मिळाला, हे महाराष्ट्राचे भाग्य म्हटले पाहिजे. त्यामुळे महाराष्ट्राचा भाग्यविधाता म्हणूनही त्यांचा उल्लेख करायला हरकत नाही. त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी अनंत शुभेच्छा!

## यंगिस्तान

# कुंभ 'रोजगार' महामेळा

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ यांची नोटीस घेण्यास नकार कारणाने परत व प्रवादी नं. २ व ३ यांची बजावणीचा रिपोर्ट आला नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १०/१०/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय -प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

## जाहीर नोटीस

ॲड. प्रमोद मोतीलाल पलसे
बी.ए.एलएल.बी. ॲडव्होकेट,
कुर्डूवाडी ता. माढा जि. सोलापूर

### टेंभुर्णी येथील मे. लवाद अधिकारी साहेब यांचे न्यायालयात

सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी
लिमीटेड पंढरपूर जि. सोलापूर -- **अर्जदार/वादी**
**विरुध्द**
धिरज राजेंद्र गायकवाड वगैरे -- **जाबदार/प्रतिवादी**

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ४९/२०२५ | १) धिरज राजेंद्र गायकवाड, वय-२८, धंदा-प्रिंटींग प्रेस, रा. कसबा पेठ, टेंभुर्णी ता. माढा जि.सोलापूर | २,१९,७४७ | २६/१२/२०२५ |
| २ | ४९/२०२५ | २) प्रभूराज अशोक भोसले, वय-४७, धंदा-प्रिंटींग प्रेस, रा.कसबा पेठ, टेंभुर्णी ता. माढा जि.सोलापूर | २,१९,७४७ | २६/१२/२०२५ |
| ३ | ४९/२०२५ | ३) किशोर गोविंद कुरूलकर, वय-४९, धंदा-ड्रिप होलसेल दुकान, रा. कसबा गल्ली, कुंभार गल्लीजवळ, टेंभुर्णी ता. माढा जि.सोलापूर | २,१९,७४७ | २६/१२/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी **नं. १ ते ३** यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस **प्रवादी नं. १ व ३ यांची नोटीस अपूर्ण पत्ता व प्रवादी नं. २ याची नोटीस पत्त्यावर नाही** या कारणाने परत आल्याने सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दीष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वर नमुद केलेल्या तारखे दिवशी **वार शुक्रवार रोजी दिनांक २६/१२/२०२५** सकाळी ११.00 वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार/प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

दिनांक १०/१०/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि., पंढरपूर**

**ठिकाण :-** सुवर्णक्रांती मल्टीस्टेट अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. पंढरपूर, कार्यालय -प्लॉट नं. २१, स्टेट बँकेसमोर, मार्केट यार्ड, टेंभुर्णी ता. माढा जि. सोलापूर

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# भारत-दक्षिण आफ्रिका निर्णायक सामना आज

## विराट कोहली हॅट्ट्रिकच्या मार्गावर



**♦ विशाखापट्टणम्, ५ डिसेंबर**

येथील एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर शनिवारी भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान तिसरा एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा तिसरा आणि शेवटचा वन-डे सामना खेळताना भारतीय संघ करा अथवा मराच्या स्थितीत आहे. सध्या तीन सामन्यांची वन-डे मालिका १-१ अशी बरोबरीत असल्यामुळे हा तिसरा वन-डे सामना रोमांचक होणार आहे. सलग दोन शतकांनंतर सर्वांचे लक्ष विराट कोहलीच्या हॅट्ट्रिकवर असेल.

चार शतके आणि २९ बळींसह १,४०१ धावांनंतर मालिकेच्या निर्णायक सामन्यात दोन्ही संघांना वेगळे करण्यासाठी फारसे काही नाही. रांची येथे पहिल्या वन-डे सामन्यात भारताने १७ धावांनी विजय नोंदवून मालिकेत आघाडी घेतली, परंतु रायपूर येथे दुसऱ्या वन-डे सामन्यात दक्षिण आफ्रिकेने ३५९ धावांचे लक्ष्य चार चेंडू व चार गडी शिल्लक असताना पूर्ण केले आणि मालिकेत बरोबरी साधली. आता निर्णायक सामन्यात नाणेफेकीचा कौलही महत्त्वाचा ठरणार आहे, भारताने आतापर्यंत एकदाही नाणेफेक जिंकले नाही.

विशाखापट्टणम्चे मैदान भारत व विराट कोहली दोघांसाठीही फायदेशीर ठरले आहे. संघाचा ७-२ असा विजय-पराजय रेकॉर्ड असला तरी, या अनुभवी खेळाडूची सात एकदिवसीय सामन्यांमध्ये ९७.८३ (५८७ धावा) ची असाधारण सरासरी आहे, यात तीन शतकांचा समावेश आहे.

कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्यात असलेल्या रोहित शर्मा व विराट कोहली या जोडीने वयस्कर खेळाडूंबद्दलच्या सर्व रूढींना झुगारून दिले आहे, त्यांचे शरीर अजूनही त्यांच्या मनाइतकेच तयार आहे. तथापि, उर्वरित संघाकडून काही प्रमाणात पाठिंबा मिळाल्यास त्यांना चांगली कामगिरी करता येईल. केवळ के.एल. राहुल आणि ऋतुराज गायकवाडने आतापर्यंत अर्थपूर्ण योगदान दिले आहे. यशस्वी जयस्वालवर सर्वांचे लक्ष असेल, तो चांगल्या सुरुवातीचा पुरेपूर फायदा उठवू शकला नाही.

प्रसिध कृष्णा, हर्षित राणा व अर्शदीप सिंग या तरुण त्रिकूटाच्या नेतृत्वाखालील गोलंदाज कसे कामगिरी करतात यावरही भारताचे नशीब अवलंबून असेल.

किनारपट्टीच्या शहराने थोडीशी थंड संध्याकाळ अनुभवली असली तरीही आर्द्रता देखील भूमिका बजावेल. भारताकडे पूर्ण संघ असला तरी, दक्षिण आफ्रिका दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात दुखापतीनंतर नांद्रे बर्गर आणि टोनी डी झोर्झी यांच्या स्कॅन निकालांची वाट पाहत आहे. जर त्यांना वगळण्यात आले तर त्यांची जागा ओटनील बार्टमन आणि रायन रिकेल्टन घेतील.

कोहलीने आपल्या कारकिर्दीत सलग तीन एकदिवसीय शतके केवळ एकदाच केली आहेत, त्यापैकी एक २०१८ मध्ये याच मैदानावर झाला आहे. तो पुन्हा या पवित्र मैदानावर मेजवानी देईल का? की १९८६-८७ नंतर भारत पहिल्यांदाच घरच्या मैदानावर द्विपक्षीय कसोटी आणि एकदिवसीय मालिका दोन्ही गमावेल? (वृत्तसंस्था)

**तिसरा वन-डे सामना**

**स्थळ** : एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियम, विशाखापट्टणम्
**वेळ** : दुपारी १.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# मुंबई इंडियन्समध्ये नवीन खेळाडूंना संधी मिळण्याची शक्यता : जयवर्धने

**♦ नवी दिल्ली, ५ डिसेंबर**

आमचा संघ अनुभवी व युवा खेळाडूंनी घडविण्यावर भर असेल त्यामुळे स्थानिक खेळाडूंना संघात स्थान मिळविण्यासाठी नवीन संधी मिळण्याची शक्यता आहे, असे मुंबई इंडियन्स संघाचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने म्हणाले.



आगामी १६ डिसेंबर रोजी होणाऱ्या आयपीएल २०२६ च्या मिनी लिलावाच्या पृष्ठभूमीवर पाच वेळा विजेत्या मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक जयवर्धने बोलत होते.

फ्रॅन्चायझीचे लक्ष सातत्य राखण्यावर आहे आणि संघ रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, जसप्रीत बुमराह, हार्दिक पांड्या आणि तिलक वर्मा यांच्यासह धावांसाठी भुकेला व उच्च प्रभाव असलेल्या खेळाडूंवर अवलंबून आहे, असे ते म्हणाले.

गत हंगामात ट्रेंट बोल्टच्या पुनरागमनामुळे महत्त्वपूर्ण मूल्य वाढले आहे आणि मिचेल सॅण्टनर व विल जॅक्स सारख्या अनुभवी आंतरराष्ट्रीय नावांना विकसित होणाऱ्या तरुण प्रतिभेशी जोडून संघाने आपले संतुलन मजबूत केले आहे, त्यामुळे एक चांगला समतोल निर्माण झाला आहे, असेही ते म्हणाले.

आम्ही या हंगामात या तरुण खेळाडूंना विकसित केले आहे आणि गत वर्षीपेक्षा त्यांनी खूप सुधारणा केली आहे. त्यांनाही त्यांचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळेल, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### इंटर मियामी- व्हँकूवर अंतिम सामना आज



**फोर्ट लॉडरडेल** : फ्लोरिडा येथे अर्जेंटिनाचा स्टार खेळाडू लियोनेल मेस्सीसाठी, शनिवारी होणारा मेजर लीग फुटबॉल (एमएलएस) चषक अंतिम सामना काही शेवटचा सामना ठरू शकतो आणि कदाचित एक नवीन सुरुवात असेल. मेस्सी आणि इंटर मियामी एमएलएसच्या विजेतेपदासाठी व्हँकूवर व्हाईटकॅप्सशी अंतिम सामना खेळतील. दोन्ही क्लबसाठी हा पहिलाच अंतिम सामना आहे, याचा अर्थ एमएलएसला पहिल्यांदाच नवीन विजेता मिळणार आहे. हा एक खूप कठीण सामना होणार आहे याची आम्हाला कल्पना आहे. हा एक खूप विशेष अंतिम असणार आहे, असे मेस्सीने म्हटले आहे. मेस्सीसाठी, हा इंटर मियामीच्या सध्याच्या घरातील शेवटचा सामना आहे. संघ पुढील हंगामात मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील बांधकामाधीन स्टेडियममध्ये जाणार आहे. संघातील खेळाडू जॉर्डी अल्बा व सर्जियो बुस्केट्स हे दोघेही शनिवारनंतर निवृत्त होत आहेत व कदाचित लुईस सुआरेझ यांच्यासोबत खेळण्याची ही शेवटची वेळ असेल. अर्जेंटिनाचा स्टार मेस्सी जगभरात क्लब व देशासाठी ४६ विजेतेपद पटकावणारा व तो फुटबॉलच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणारा आतापर्यंतचा महान खेळाडू मानला जातो.

### अमेरिका क्रीडाप्रेमींसाठी व्हिसाला प्राधान्य देते

**वॉशिंग्टन** : ट्रम्प प्रशासनाने जगभरातील अमेरिकन दूतावास आणि वाणिज्य दूतावासांना अमेरिकेत गुंतवणूक करण्यासाठी किंवा २०२६ च्या विश्वचषक, २०२८ च्या ऑलिम्पिक व इतर प्रमुख क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिकेला भेट देऊ इच्छिणाऱ्या परदेशी नागरिकांच्या व्हिसा अर्जांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याच वेळी, प्रशासनाने विशिष्ट व्हिसा मिळवणाऱ्या उच्च कुशल परदेशी कामगारांसाठी नवीन निकष जोडले आहेत.

### दक्षिण आफ्रिका संघाचे नेतृत्व बुलबुलियाकडे

**जोहान्सबर्ग** : दक्षिण आफ्रिकेने आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषकासाठी १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. यामध्ये १५ जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान नामिबिया आणि झिम्बाब्वे येथे होणाऱ्या या स्पर्धेत मुहम्मद बुलबुलिया संघाचे नेतृत्व करणार आहे.

दक्षिण आफ्रिकेला वेस्ट इंडीज, अफगाणिस्तान आणि टांझानियासह गट ड मध्ये स्थान देण्यात आले आहे. १६ जानेवारी रोजी दक्षिण आफ्रिकेचा विंडहोक येथील एचपी ओव्हल येथे अफगाणिस्तानशी सामना होईल.

दक्षिण आफ्रिकेच्या १९ वर्षांखालील निवड समितीचे संयोजक पॅट्रिक मोरोनी म्हणाले, या संघाच्या संतुलनावर आम्ही खूश आहोत. निवडलेल्या प्रत्येक खेळाडूने सातत्यपूर्ण कामगिरी आणि मजबूत कामाच्या नैतिकतेद्वारे त्यांचे स्थान मिळवले आहे. या गटाने दबावाच्या परिस्थितीत खरी परिपक्वता दाखवली आहे आणि त्यांच्याकडे युवा क्रिकेटच्या सर्वोच्च स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्य आणि स्वभाव आहे.

जागतिक स्पर्धेपूर्वी, संघ ५ ते ७ जानेवारी २०२६ दरम्यान बेनोनी येथील विलोमूर पार्क येथे तीन युवा एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचा सामना करेल.

या खेळाडूंनी दाखवलेली प्रगती मला सर्वात जास्त प्रभावित करते. आपण केवळ क्रिकेटपटूच नाही तर या देशासाठी चांगले तरुण विकसित करत आहोत, असे मुख्य प्रशिक्षक मकेता म्हणाले. क्रिकेटच्या बाबतीत, आंतरराष्ट्रीय स्तरावर आवश्यक असलेल्या तीव्रतेची त्यांची समज उत्कृष्ट आहे. ते त्यांच्या प्रशिक्षकांसोबत काम करण्यास परतले आहेत आणि प्रत्येक सत्रात एका नवीन पातळीच्या हेतूने परतले आहेत, जे विश्वचषकात स्पर्धा करण्यासाठी आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

### १२ वर्षांखालील गटाची जिल्हा क्रिकेट निवड चाचणी आता १२ डिसेंबरपासून

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणारी १२ वर्षांखालील गटाची निवड चाचणी आता येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम वर १२ व १३ डिसेंबरला सकाळी १० ते ५ यावेळेत होईल. तरी इच्छुक खेळाडूंनी सुधारित बदलाची नोंद घ्यावी, असे असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी कळविले आहे.

# पहिल्या सामन्यात मुंबईचा निसटता विजय

## १५ वर्षांखालील मुलींच्या आंतरराज्य सराव स्पर्धा

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर आजपासून महाराष्ट्र, मुंबई व बडोदा या तीन राज्याच्या १५ वर्षाखालील मुलींच्या एक दिवसीय (३५ षटके)सामन्यांच्या स्पर्धेला सुरुवात झाली व सलामीच्या सामन्यात मुंबई संघ महाराष्ट्र विरुद्ध चार धावांनी विजयी झाला.

सकाळी १० वाजता सुरू झालेल्या सामन्यात महाराष्ट्राने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेत मुंबई संघाला फलंदाजी पाचारण केले. मुंबई संघाने ३५ षटकात ५ बाद २२१ धावसंख्या उभारली ती सलामीवीर वेदिका निकम व रिया ठाकूर चे अर्धशतकाच्या जोरावर. सामन्याच्या दुसऱ्या शतकात स्वामिनी बेलेकर ने श्रुतिका पाटील हिला बात करत झटका दिला परंतु नंतर वेदिका निकम (५७ धावा ५३ चेंडू ११ चौकार) हिने रिया ठाकूर (८१ धावा ७६ चेंडू १० चौकार) सोबत ८९ धावांची भागीदारी रचली. वेदिका बाद झाल्यावर सोनाक्षी सोळंकी (२१) उन्नती पाटील (२८) सारथी भाकरे (१८) यांनी धावसंख्येला हातभार लावला. महाराष्ट्र कडून अनुष्का राठोड हिने २ व मधुश्री उपळावीकर, स्वामिनी बेलेकर यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

विजयासाठी २२२ धावांचे लक्ष गाठताना निर्धारित ३५ षटकात महाराष्ट्राचा संघ ६ बाद २१७ धावाच करू शकला व शेवटच्या शतकापर्यंत रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात मुंबई संघ केवळ चार धावांनी विजयी झाला. महाराष्ट्राकडून सलामीवीर गायत्री हांडे (४३) तसेच सोनल शिंदे (६१) स्वामिनी बेलेकर (५१) धावा केल्या परंतु ह्या तिघी बाद झाल्यानंतर इतर फलंदाज लक्ष्य गाठू शकले नाहीत. मुंबई कडून गंगना मुलाकाला हिने ३ व सारथी भाकरे, काव्या भागवत यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. सामन्यासाठी पंच म्हणून नवीन माने व अतिक शेख यांनी काम पाहिले. उद्या मुंबई विरुद्ध बडोदा असा सामना होणार असल्याचे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने कळविण्यात आले. महाराष्ट्र संघा चा खेळ पाहून पुढील महिन्यात बीसीसीआयच्या स्पर्धेसाठी संघ निवडीकरिता निवड समिती प्रमुख ऋचा शिंदे व सदस्य हजर असून प्रमुख प्रशिक्षक सचिन नायर व इतर सहाय्यक स्टाफ यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्राच्या मुली सामन्यात प्रदर्शन करत आहेत.

# दिव्यांग गंगा कदमचा सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने धनादेश देऊन सन्मान



**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

अंध महिलांच्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघातील येथील गंगा कदम हिचा सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने २१ हजाराचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.

नुकत्याच झालेल्या अंध महिलांच्या २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ विजेता ठरला असून त्या संघाची उपकर्णधार ही सोलापूरची गंगा कदम होती. त्यानिमित्ताने तिचा व तिचे प्रशिक्षक राज शेळके यांचा सत्कार सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे वतीने अध्यक्ष दिलीप माने व व्हाइस चेअरमन श्रीकांत मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रिकेट संघटनेचे प्रमुख पदाधिकारी, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे महिला संघाच्या निवड समिती प्रमुख स्नेहल जाधव, मुलींच्याच १५ वर्षाखालील संघाच्या निवड समिती प्रमुख ऋचा शिंदे, सदस्य आणि मुंबई संघाच्या निवडकर्त्या नीलम पाटील यांच्यासह महाराष्ट्र, मुंबई संघाचे प्रमुख प्रशिक्षक, खेळाडू उपस्थित होते.

इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवर झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील मालप व राजेंद्र गोटे यांनी केले.



## सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या तिघांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

शालेय शहर सायकलिंग स्पर्धेतून सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या तिघींची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. शहर स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात श्रद्धा धोत्रेने द्वितीय, १७ वर्षाखालील गटात समीक्षा उकरंडे चौथा व प्रांजल कलशेट्टी सहावा क्रमांक प्राप्त केला. त्यांना क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर व प्रचिता जोगदांडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, पालक सदस्य प्रभुराज मैंदर्गीकर, मुख्याध्यापिका संगीता गोटे व पर्यवेक्षिका सुनीता वाले यांनी अभिनंदन केले.

# विभागीय फुटबॉल स्पर्धेत ए. जी. पाटील अभियांत्रिकी उपविजेता




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे अंतर्गत सोलापूर झोनल फुटबॉल स्पर्धेत ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने उपविजेतेपद संपादिले. संघास क्रीडा विभागप्रमुख प्रा. शिवशरण कोरे यांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे संस्था अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, सचिव शिवानंद पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरात खेलो इंडियाचे धनुर्विद्या सेंटर

## पालघर, ठाणे व मुंबई उपनगरमध्येही सेंटर मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि ५ डिसेंबर-**

भारतीय खेल प्राधिकरणाने (साई) महाराष्ट्रात चार खेलो इंडिया सेंटरना याअगोदरच मान्यता दिली होती. त्यात सुधारणा केली असून सोलापुरात बॅडमिंटनऐवजी धनुर्विद्या (आर्चरी) सेंटर देण्यात आल्याचे साईचे संचालक डॉ. नदीम अहमद दार यांनी कळविले आहे.



सोलापुरसह महाराष्ट्रात पालघर, ठाणे व मुंबई उपनगरला ही सुधारित सेंटर मंजूर केली आहेत. पालघरला बॉक्सिंगऐवजी ॲथलेटिक्स, ठाण्याला बॅडमिंटन ऐवजी वेटलिफ्टींग, मुंबई उपनगरला कबड्डीचे सेंटर मंजूर करण्यात आले.

**धनुर्धरांना आधिक सोयी-सुविधा मिळतील**

सोलापूर जिल्ह्याची अनेक वर्षांची मागणी मान्य झाली. भारतीय खेळ प्राधिकरणाचे आर्चरी सेंटर सोलापूरला मिळावे म्हणून अनेक वर्षे खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. अभिजीत पाटील, भारत शिंदे व मी स्वतः प्रयत्न करत होतो. त्या प्रयत्नांना यश आल्याचा नक्कीच आनंद आहे. सोलापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या पाठपुराव्यामुळे हे शक्य झाले. त्यामुळे जिल्ह्यातील धनुर्धरांना आधिक सोयी-सुविधा मिळतील.

**-हरिदास रणदिवे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र धनुर्विद्या संघटना**

# सोलापूरसह धाराशिव, ठाणे व पुण्याची घोडदौड

## कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**अहिल्यानगर, दि. ५ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर येथे सुरू झालेल्या ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी प्रेक्षकांनी रोमहर्षक क्षणांचा मनसोक्त आनंद घेतला. मुलींच्या गटात धाराशिव, सोलापूर, ठाणे, सांगली, पुणे आणि रत्नागिरी यांनी प्रभावी कामगिरी केली, तर मुलांच्या गटात धाराशिव, सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, सातारा, नाशिक आणि पुणे संघांनी दमदार विजय मिळवत स्पर्धेत जोरदार मुसंडी मारली.

**मुली गटातील झंझावत प्रदर्शन**

सकाळच्या पहिल्या सामन्यात धाराशिवच्या मुलींनी रायगडवर १ डाव ३२ गुणांनी (४४-१२) दणदणीत विजय मिळवला. संघातील मैथिली पवारने ४.२० मिनिटे पळती खेळ करत तब्बल १० गुणांची कमाई करून सामन्याची शान वाढवली. राही पाटील (२.१० मि. संरक्षण व २ गुण), मुग्धा वीर (३.१० मि. संरक्षण व २ गुण), श्रावणी गुंड (३.२० मि. संरक्षण व २ गुण) यांनीही भक्कम खेळ सादर केला.

दुसऱ्या सामन्यात सोलापूरने धुळेचा १ डाव १९ गुणांनी (३३-१४) पराभव केला. अश्विनी मांडवे (३ मि. संरक्षण व ४ गुण) आणि कल्याणी लामकाणे (३.०१ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. धुळ्यातर्फे हर्षदा कोळी (६ गुण) हिने संघाचा मान राखला.

ठाणे संघाने चुरशीच्या लढतीत मुंबईचा १ डाव १३ गुणांनी (२९-१६) पराभव केला. प्राची वांगडे (३ मि. संरक्षण व ४ गुण), वैष्णवी जाधव (नाबाद २.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयात सिंहाचा वाटा उचलला.

रत्नागिरीने जालन्यावर ५ गुणांनी (३६-३१) अतिशय कडवी लढत देत विजय संपादन केला. रिद्धी चव्हाण (२, ३ मि. संरक्षण व २ गुण) व वैष्णवी फुटक (८ गुण) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

**मुलांच्या गटात चुरस व थरार**

धाराशिव संघाने रायगडवर १ डाव २१ गुणांनी (३९-१८) मात केली. हारद्या वसावे (४.२० मि.) आणि राज जाधव (३.२० मि.) यांनी चमकदार पळतीचा खेळ केला. रायगडकडून ओम जगदाळेने ८ गुणांची आक्रमक खेळी केली. सोलापूरने जालना संघाचा १ डाव ८ गुणांनी (२८-२०) पराभव केला. अरमान शेख (३ मि. संरक्षण व ८ गुण) आणि शंभूराज चंदनशिव (२.५० मि. संरक्षण) चमकले. जालना संघाचा रोहित चारवंडेने १० गुणांची आगळी कामगिरी करून सर्वांचे कौतुक मिळवले. अहिल्यानगरने बीडचा १ डाव १७ गुणांनी (३१-१४) पराभव करत घरच्या मैदानावर दमदार प्रदर्शन केले. साई लव्हाट (३.३० मि. संरक्षण) विशेष ठरला.

ठाणे संघाने रोमांचक लढतीत मुंबई उपनगरचा ७ गुणांनी (३१-२४) पराभव केला. ड्रीम रनमधून मिळवलेले ४ गुण विजयात निर्णायक ठरले. ओंमकार सावंत व वेदांत यांनी मोलाची कामगिरी बजावली.

साताऱ्याने मुंबई संघावर रोमांचक १ गुणांनी (२७-२६) विजय मिळवला. अंतिम क्षणापर्यंत श्वास रोखून धरणारा सामना खेळवला गेला.

**अन्य सामन्यांचे निकाल: मुली :**

सांगली विजय नंदुरबार १ डाव ३२ (४६-१४), सातारा विजय मुंबई उपनगर ९ गुणांनी (३१-२२), पुणे विजय अहिल्यानगर १ डाव १६ गुणांनी (२४-८), नाशिक विजय पालघर १ डाव १७ गुण.

**मुले** : नाशिक विजय रत्नागिरी १ डाव ११ गुणांनी (२७-१६). पुणे विजय धुळे १ डाव २७ गुणांनी (४५-१८). सांगली विजय नंदुरबार १ डाव ५ गुणांनी (२२-१७).

**पहिल्या दोन दिवसातच स्पर्धेने उंचावला रोमांचाचा कळस**

अत्यंत उत्साही वातावरणात आणि भरपूर प्रेक्षकांच्या उपस्थितीत सर्व सामने जोश व चुरशीने खेळले गेले. पुढील दिवसातील बाद फेरीतील सामने आणखी रंगतदार होतील अशी उत्सुकता व्यक्त केली जात आहे.

# वैकुंठ स्मशानभूमीतील बंद गॅस दाहिनी त्वरीत दुरुस्त करा

## नागरिकांची मागणी; पारंपारिक पध्दतीनेच करावे लागतात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ डिसेंबर-**

येथील वैकुंठ स्मशानभूमीतील ५० लाख रुपये खर्चुन बसविण्यात आलेली गॅसदाहिनी गेल्या दोन, चार वर्षापासून बंदच आहे. त्यामुळे आपल्या आप्तस्वकीयांच्या पार्थिवावर या गॅसदाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्याची इच्छा असताना देखील मृतांच्या नातेवाईक मंडळींना येथील स्मशानभूमीमध्ये सध्या पारंपारिक पध्दतीनेच अंत्यसंस्कार करावे लागत आहेत. त्यामुळे बंद असलेली गॅस दाहिनी त्वरीत सुरु करावी अशी मागणी शहर व उपनगरातील नागरिकांमधुन केली जात आहे.

येथील वैकुंठ स्मशानभूमीत मृतदेहावर लाकडाचा वापर करुन अंत्यसंस्कार करण्यात येत होते. लाकडाच्या वाढलेल्या किंमती आणि लाकूड वापरामुळे प्रचंड प्रमाणात होत असलेले प्रदूषण तसेच दिवसेंदिवस वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे बिघडत चाललेले संतुलन यामुळेच इंधनासाठी लाकडा ऐवजी सोलार किंवा गॅसचा वापर करण्यावर केंद्र व राज्य सरकारकडून भर दिला जात आहे. दरम्यान पंढरपूरातील वैकुंठ स्मशानभूमीत राज्यसभेचे तत्कालीन खासदार राजकुमार धुत यांच्या खासदार निधीतून पन्नास लाख रुपये आणि येथील नगरपालिकेने काही निधी खर्चुन मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी गॅस दाहिनी उभी केली होती.

गॅस दाहिनी उभी करण्यात आल्यावर देखील येथील स्मशानभूमीत पारंपारिक पध्दतीने आणि गॅस दाहिनीवर अंत्यसंस्कार करण्याची सुविधा पालिकेकडून नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. सुरुवातीला काही दिवस मृतांच्या अनेक इच्छुक नातेवाईकांकडून या गॅस दाहिनीमध्ये आपल्या आप्तस्वकीयाच्या मृतदेहांवर अंत्यंस्कार करण्यात आले होते. तर ज्यांना गॅसदाहिनीमध्ये अंत्यसंस्कार करणे पटत नव्हते ते पारंपारिक पध्दतीने आपल्या नातेवाईकाच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करीत होते. मात्र गॅस दाहिनी सुरु झाल्यावर काही महिन्यांमध्येच



> गॅस दाहिनी दुरुस्त झाल्यास मृतदेहावर अंत्यसंस्कार करणे सोपे होईल. या बरोबरच होणारे प्रदूषण टाळले जाईल,पर्यावरणाचा होणारा ऱ्हास देखील थांबला जाईल. त्यामुळे पालिकेने त्वरीत बंद पडलेली गॅस दाहिनी सुरु करावी अशी आमची विनंती आहे.
>
> **- अजय जाधव (एक नागरिक)**

कोरोनाच्या एक, दोन लाटा आलेल्या होत्या. त्या काळात कोरोना आजारामुळे मृत झालेल्या व्यक्तींवर अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्या इतरांना कोरोनाचा प्रादुर्भाव होवू नये याची काळजी घेवून अंत्यसंस्कार करण्याच्या प्रशासनाकडून काही मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी अंत्यसंस्कारासाठी उपस्थितांच्या संख्येवर मर्यादा देखील लावण्यात आलेल्या होत्या. त्यावेळी सुरुवातीला तर कुटुंबातील एक, दोघां सदस्यांच्या उपस्थितीत पालिका कर्मचाऱ्यांकडूनच कोरोनामुळे मृत झालेल्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येत होते. येथील स्मशानभूमीत देखील खबरदारी घेऊन कोरोनामुळे मृत झालेल्या व्यक्तीच्या मृतदेहावर सुरुवातीला काही दिवस गॅस दाहिनीद्वारे अंत्यसंस्कार करण्यात आले. यासाठी येथील नगरपरिषदेकडून एक हजार रुपये एवढा माफक दर आकारण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींच्या काळात अंत्यविधीसाठीचा येणारा खर्च देखील कमी झाला. पर्यायाने होणारे प्रदूषणही देखील रोखले गेले. या बरोबरच अंत्यसंस्कार करताना अंत्यसंस्कारासाठी उपस्थित असलेल्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव होण्याचा धोका देखील कमी झाला होता ही एकीकडे वस्तुस्थिती होती. तर दुसरीकडे मात्र कोरोनामुळे झालेले मृतदेह जाळल्यामुळे याचा परिणाम विपरीत झाला. कारण कोरोनामुळे मृत झालेले मृतदेह हे प्लास्टिक बॅग मध्ये ठेवलेले असायचे. त्यामुळे अशा पार्थिवावर अंत्यसंस्कार करताना तो गॅस दाहिनी मध्ये तसाच ठेवला जायचा. अशा प्रकारे कोरोनामुळे मृत झालेल्या अनेकांच्या पार्थिवावर त्यावेळी या गॅसदाहिनी मध्येच अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामुळे गॅस दाहिनीच्या चिमणी मध्ये काजळी चढत गेली.

परिणामी पर्यावरण पूरक असणारी ही गॅस दाहिनी बंद पडली. दरम्यान पालिकेकडून पुन्हा या गॅस दाहिनीच्या दूरुस्तीसाठी कोणतेच प्रयत्न झाले नाहीत. त्यामुळे गेल्या दोन, चार वर्षापासून शहर तसेच उपनगरातील नागरिकांना आपल्या नातेवाईकाच्या मृतदेहावर गॅस दाहिनी मध्ये अंत्यसंस्कार करण्याची इच्छा असून देखील गॅस दाहिनी बंद असल्यामुळे त्यांना पारंपारिक पध्दतीनेच लाकडे जाळून अंत्यसंस्कार करावे लागत आहे.

पारंपारिक पध्दतीने अंत्यसंस्कार करण्यासाठी खर्च देखील मोठा येतो आहे. सर्वात मोठी बाब म्हणजे यासाठी वृक्षतोड देखील करावी लागत आहे. पावसाळ्या मध्ये लाकडे ओली असल्यामुळे मृतदेहांवर अंत्यसंस्कार करताना कमालीचा त्रास होत असतो. त्यामुळे पालिकेने या सर्व बाबींचा विचार करुन लवकरात लवकर गॅस दाहिनीच्या दूरुस्तीचे काम हाती घ्यावे. येत्या काळात ती दूरुस्त करावी आणि नागरिकांना गॅस दाहिनीमध्ये मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्याची सुविधा पुन्हा एकदा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शहर तसेच उपनगरातील सुज्ञ नागरिकांमधून केली जात आहे.

# नवे पोलिस महासंचालक डॉ.सदानंद दाते कृतज्ञतेचे प्रतिक

**२६/११ च्या मुंबईतील त्या रात्री ज्यांनी दहशतवाद्यांना सामोरे जाऊन स्वतःवर गोळ्या झेललेल्या आहेत, असे डॉ. सदानंद दाते हे केवळ एक आदराचे नाव नाही तर आपल्या सगळ्यांच्या कृतज्ञतेचे प्रतीक आहेत. महाराष्ट्र सरकारने त्यांची राज्याचे नवे महासंचालक म्हणून नियुक्ती केली आहे.**

-------------------



डॉ.सदानंद दाते हे तेच अधिकारी आहेत ज्यांनी १७ वर्षांपूर्वी कामा हॉस्पिटलच्या दालनात मृत्यूच्या डोळ्यात डोळे घालून लढा दिला होता. २६ नोव्हेंबर २००८ रोजी जेव्हा मुंबईचे रणांगण बनले होते, त्या रात्री जेंव्हा अझमल कसाब आणि त्याचे पाकिस्तानी साथीदार मुंबईत रक्तरंजित धुडगूस घालत होते, तेंव्हा तत्कालीन अतिरिक्त पोलीस आयुक्त डॉ.सदानंद दाते थेट दहशतवाद्यांना सामोरे गेले होते. केवळ सर्व्हिस रिव्हॉल्व्हर आणि कर्तव्याच्या अढळ जाणिवेच्या बळावर त्यांनी आपल्या छोट्या पथकासह कामा रुग्णालयात प्रवेश केला. ते स्वतः या पथकाला लीड करत होते. तिथे दहशतवाद्यांनी महिलांना आणि मुलांना ओलीस ठेवलं होतं. गोळीबाराच्या प्रखर देवाणघेवाणीत त्यांना गोळी लागली. अशाही स्थितीत ते स्वतः पुढे जात राहिले. आणि स्वतः जखमी असतानाही ओलीस ठेवलेल्या रुग्णांना व कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्यात निर्णायक भूमिका बजावली. त्यांची ही कृती त्या रात्री वीरतेचे जिवंत प्रमाण बनली! मुंबईचे रक्षण करणारा हा अधिकारी आता संपूर्ण महाराष्ट्राचे नेतृत्व करणार आहे. १९९० बॅचचे आयपीएस अधिकारी असलेले डॉ.सदानंद दाते (त्यांनी पोलीस प्रशासनात पीएचडी केलेली आहे) यांनी एक विलक्षण प्रभावी कारकीर्द घडवली आहे. त्यांनी याआधी महाराष्ट्र टीएसचे प्रमुख, एनडीआरएमचे महासंचालक (चक्रीवादळ, पूर, कोविड काळात असंख्य जीव वाचवले) आणि सर्वात अलीकडे राष्ट्रीय तपास यंत्रणा NIचे महासंचालक या महत्वाच्या पदांवर यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली आहे. त्यांचे अनेक सहकारी सांगतात की २६/११ चे 'बुलेट-मार्क्स' त्यांनी आयुष्यातून कधी पुसले नाहीत. त्या जखमा नसून, ते बुलेट-मार्क्स सदैव कर्तव्याची आठवण करून देतात असं ते सांगतात. म्हणूनच मी याला केवळ एक प्रशासकीय नियुक्ती म्हणून पाहत नाही, तर अनेक मैदाने मारून पुन्हा एकदा त्यांनी १७ वर्षांपूर्वी गाजवलेल्या रणांगणात मुंबईच्या या सुपुत्राची घरवापसी आहे असंच पाहतोय!

आजच्या काळात सर्वच राज्यांना सायबर धोके, किनारी/बॉर्डर सुरक्षा, संघटित गुन्हेगारी, दहशतवादाचे धोके, शहरी गुन्हेगारी, सामाजिक गुन्हे यांसारख्या अनेक गुंतागुंतीच्या आव्हानांना तोंड द्यावे लागणारच आहे. अशा काळात, ज्यांनी राष्ट्रासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा केली नाही, ज्यांनी स्वतःच्या शरीरावर गोळ्या झेलल्या अशा अधिकाऱ्याचे नेतृत्व आपल्या राज्याला मिळणे हे भाग्यच म्हणावे लागेल! आपल्या अद्वितीय शौर्याला माझे १०० सॅल्युट आणि पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा, सर! जय हिंद, जय महाराष्ट्र

**- वेद कुमार.**

# हेरिटेज मणिधारी येथे दत्त जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ नोव्हेंबर -**

येथील हेरिटेज मणिधारी नगरात श्री दत्त जयंतीनिमित्त गुरुनाथ सुतार गुरुजी यांनी श्री दत्त चरित्रावर सात दिवस प्रवचन केले. मानवी जीवनावर या चरित्र श्रवणाचा कसा परिणाम होतो. हे अनेक उदाहरणे देऊन, संसारिक व्यक्तिवर अतिशय फलदायी परिणाम होतो.हे कथारुपाने स्पष्ट केले.

याचे आयोजन काशिनाथ बिराजदार यांनी साकारले. याप्रसंगी श्री दत्त जन्मोत्सव व पाळणा कार्यक्रमासाठी मल्लिकार्जुन नगर, संगमेश्वर नगर, कल्याण नगर, यशराज नगर येथील भाविक उपस्थित राहून कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पाळणा गीते गावून साजरा केला. याप्रसंगी संत साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ.



भीमाशंकर बिराजदार म्हणाले, संत साहित्यात दत्त संप्रदायाचे मोठे योगदान असून जीवनातील अनेक समस्यांवर उपाय देण्याचे कार्य या संप्रदायातील साधकांनी केले आहे. शाबरी देवी महिमा, दत्त गुरुमहिमा यांचा प्रभाव आज ही भक्तांना दिलासा देतो. सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष सतीश नोमूल यांचे यासाठी सहकार्य लाभले. आठवडाभर प्रवचन केलेल्या गुरुनाथ सुतार यांचा सत्कार प्रा.डॉ. भीमाशंकर बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी काशिनाथ बिराजदार, गोविंदे काका, शंकर गाडा, म्हमाणे, क्षीरसागर काका, अप्पू बिराजदार उपस्थित होते. हेरिटेज मणिधारीचे अल्केश पटेल यांनी प्रसाद वाटप केले.

# डिजिटल समावेशन वाढवण्यासाठी एआय मिशनला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

सुलभ प्रवेश, उत्पादकता आणि डिजिटल समावेशन वाढवण्यासाठी भारत सरकारच्या एआय मिशनला पाठींबा देत मेझॉनने आज २०३० पर्यंत भारतातील लाखो लोकांपर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) पोहोचवण्याची योजना जाहीर केली. कंपनी स्थानिक क्लाऊड आणि एआय इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये १२.७ अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याच्या मार्गावर आहे आणि आपल्या विविध व्यवसायांद्वारे १५ दशलक्षपेक्षा जास्त लघु व्यवसायांना एआय चे लाभ मिळवून देईल. मेझॉनने २०३० पर्यंत शासकीय शाळांतील ४ दशलक्ष विद्यार्थ्यांपर्यंत एआय साक्षरता आणि करिअर जागरूकता पोहोचवण्याचेही आश्वासन दिले आहे.कंपनी एआय चा वापर करून मेझॉन डॉट इन वरील कोट्यावधी ग्राहकांसाठी खरेदी अधिक सोपी आणि अधिक अनुभवसमृद्ध बनविण्याचे काम करतच राहणार आहे.ज्या गोष्टीमुळे अनेक जण मागे राहतात असे भाषा, साक्षरता आणि सुलभ प्रवेश या अडथळ्यांना दूर करत एआय मध्ये भारतात मोठ्या प्रमाणावर समानता आणण्याची क्षमता आहे, असे मेझॉन इंडियाचे कंट्री मॅनेजर समीर कुमार यांनी सांगितले.

**CHANGE IN NAME**

I have hereby declared that my old name **Mahesh Shivasharanappa Totad** has been changed to New Name as **Mahesh Shivasharan Totad,** Address : 32,Jodbhavi Peth, Solapur-413 002. kindly note the same.

# माचणूर येथील उजनी कार्यालय कुलूपबंद; शेतकऱ्यांची गैरसोय

## वरिष्ठ पातळीवरुन चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.५ डिसेंबर-**

माचणूर येथील उजनी कालवा उपविभाग क्रमांक ३८ मधील अधिकारी व कर्मचारी येथे उपस्थित राहत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी असून वरिष्ठ पातळीवरुन याच्या चौकशीची मागणी शेतकरी वर्गातून पुढे येत आहे. दरम्यान या परिसरातील शेतकऱ्यांना त्यांच्या कामासाठी १५ कि.मी.अंतरावर मंगळवेढा येथे जावून कामे मार्गी लावावी लागत असल्याने शेतकरी वर्गातून संताप व्यक्त होत आहे.

या कार्यालयाची शासकीय इमारत गेल्या अनेक वर्षापासून येथे उभी असून पुर्वी येथे अधिकारी व कर्मचारी कार्यरत असल्याने परिसरातील शेतकऱ्यांची कामेही तात्काळ मार्गी लागत होती. श्री सिध्देश्वर मंदिरासमोर हे कार्यालय असून येथील अधिकारी कर्मचायांची राहण्याची गैरसोय होवू नये म्हणुन वसाहत ही बांधण्यात आली आहे. मागील अनेक महिन्यापासून या कार्यालयात अधिकारी व कर्मचारीही उपस्थित राहत नसल्या मुळे बठाण,उचेठाण, ब्रम्हपुरी, माचणूर, तामदर्डी, रहाटेवाडी, बोराळे, सिध्दापूर, अरळी, नंदूर आदी शेतकऱ्यांना त्यांच्या कामासाठी सध्या मंगळवेढ्याच्या कार्यालयाचे उंबरठे झीजवावे लागत आहेत. ज्या शेतकऱ्याच्या शेतामधून कॅनॉल गेला आहे ते शेतकरी पैशासाठी हेलपाटे मारतानाचे चित्र आहे. त्याच बरोबर कॅनॉलवरुन

> कार्यालय दररोज उघडे असून अधिकारी व कर्मचारी येथे नेहमी असतात.
>
> **- सुदर्शन गोडसे,**
> वरिष्ठ अधिकारी उजनी उपविभाग क्र.३८ माचणूर



रस्ता मार्गी लावण्यासाठीही शेतकरीवर्ग माचणूर कार्यालयाकडे हेलपाटे मारत आहेत. कॅनॉल काढते प्रसंगी ज्या शेतकऱ्यांच्या जमीनी खरेदी केल्या. त्यांना निधी मिळण्यासाठी ते कार्यालयाकडे उंबरठे झीजवत आहेत. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी शासनाने निर्णय घेवून एवढी मोठी इमारत बांधूनही येथे एक अधिकारी ना एक कर्मचारी कार्यालयात रहात नसून सतत हे कार्यालय कुलूपबंद अवस्थेत असल्याच्या तक्रारी आहेत. या घटनेची वरिष्ठ पातळीवरुन चौकशी होवून दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी जोमाने शेतकरी वर्गातून पुढे येत आहे. उजनी कार्यालय परिसरातच कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी शासकीय खोल्याही आहेत. मात्र, या ठिकाणी प्रत्यक्षात कर्मचारी न राहता अन्य खाजगी व्यक्ती राहत असल्याचे गौडबंगाल उघड होत आहे याचीही चौकशी होणे तितकीच महत्वाची असल्याच्या प्रतिक्रीया व्यक्त होत आहेत.

**अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर**

**ई निविदा क्र.: 2025_ANMC_1255663_1**

**अहिल्यानगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील विविध कामांचे अनुषंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५ २६ अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील कोठला बसस्थानक ते नटराज हॉटेलपर्यंत १००० एम एम व्यासाची एम. एस. पाईपलाईन टाकणे या कामाचे तपशील** http://mahatenders.gov.in **या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०९३/ २०२५
नि. ६

**सोलापूर येथील मा. २ रे दिवाणी न्यायाधीश क स्तर, सोलापुर यांचे न्यायालयात**

१. श्रीमती निर्मला चंद्रकांत दामजी,
वय ६४ वर्षे, धंदा घरकाम,
रा. ७ नं. झोपडपट्टी, गांधीनगर,
अक्कलकोट रोड, सोलापूर,
२. नागेश्वर चंद्रकांत दामजी,
वय ४५ वर्षे, धंदा व्यापार
रा. सावजी किराणा दुकानाजवळ,
१५५-४, गांधीनगर, सोलापूर,
३. सौ. रेणुका श्रीकांत क्षत्रिय,
वय ४० वर्षे, धंदा घरकाम,
फ्लॅट नं.९, मराठी स्कृती अपार्टमेंट,
अंबड लिंक रोड, नाशिक,
४. नंदकिशोर धोंडुसा दामजी,
वय ६८ वर्षे, धंदा- नाही
रा. १०२ डी ११, भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर,
५. लक्ष्मी किसन हबीब,
वय ६७ वर्षे, धंदा घरकाम,
रा. ३२८, साखर पेठ, सोलापूर -- **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही** -- **सामनेवाले**

१. ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांचे पुर्वज धोंडुसा चंदुलाल उर्फ चंदुलालसा दामजी होते. ते दि. २५.५.२०१२ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. त्यांची पत्नी अंबुबाई धोंडुसा दामजी ही देखील दि. १९.७.१९९८ रोजी सोलापूर येथे मयत झाली आहे. अशाप्रकारे अर्जदार क्र. १ ते ५ ही मयत धोंडुसा चंदुलाल उर्फ चंदुलालसा दामजी व त्यांची पत्नी अंबुबाई यांचे कायदेशीर वारसदार होते व आहेत,

२. यातील मयत धोंडुसा चंदुलाल उर्फ चंदुलालसा दामजी याचे नांवे सोलापूर महानगरपालिका हद्दीत घर मिळकत क्र. ५८३६७८ पेठ ५८, पत्ता १७२, गांधीनगर झोपडपट्टी नं. ७, अक्कलकोट रोड, सोलापूर ही होती. सदर मिळकतीचे हक्कपत्रकी अर्जदारांची नावे लावण्यासाठी त्याच्या नावे ते मयत्त धोंडूसा चंदुलाल उर्फ चंदुलालसा दामजी यांचे कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार नं. १ ते ५ यांच्या नावे वर नमुद मिळकतीस नावे लावण्यासाठी वारसा दाखला देण्याबाबत कोणाची कांही हरकत असल्यास, त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमली तारीख ५/१/२०२६ रोजी स्वतः अथवा कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास, मे. कोर्ट सदर अर्जाकामी पुढील योग्य ते आदेश पारीत करतील.

आज दि. ५ माहे डिसेंबर २०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाने शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपीक**

**शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सिव्हील एम. ए. नं. ५७/२०२५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु.डी. यांचे कोर्टात**

१) **श्रीमती भारती भुजंगप्पा किवडे**
रा. फुटाणे गल्ली, अक्कलकोट
२) **श्री. सोमशेखर भुजंगप्पा किवडे** -- **अर्जदार**
रा. फुटाणे गल्ली, अक्कलकोट
३) **श्री. शिवकुमार भुजंगप्पा किवडे**
रा. फुटाणे गल्ली, अक्कलकोट

**विरुध्द**

**कोणीही नाही** -- **सामनेवाले**

ज्या अर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५७/२०२५ हा दि. बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र प्रमाणे दाखल केला असून यातील अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील भुजंगप्पा सोमलिंग किवडे हे दि. २७/०९/२०२४ रोजी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे उपचारादरम्यान निधन पावले आहेत. अर्जदार हेच मयत भुजंगप्पा सोमलिंग किवडे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे म्हणून यातील अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे मयत भुजंगप्पा सोमलिंग किवडे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ०७/०१/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ०४/१२/२०२५

**शिक्का**

**सही/-**
**सहा अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

**जाहीर समन्स**

मा. उपनिबंधक,
सहकारी संस्था (परसेवा),
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर
१९३ (अ), सिद्धेश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखे शेजारी,
सोलापूर-४१३००१.

**महेश अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर**
४१८, दक्षिण कसबा, सोलापूर -- अर्जदार

**-विरुध्द-**

(खालील तपशिलातीत नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ३१३/२५-२६ | १,०८,५५३/- | ३ | **संतोष मल्लिनाथ स्वामी** रा. प्लॉट नं २७८ काडादी नगर बँक ऑफ इंडिया शेजारी होटगी रोड सोलापूर - ४१३००४ |
| २ | ३१४/२५-२६ | ८०,७७३/- | ३ | **सागर शिवशरणप्पा कणमुस** रा. ८२/ब वसंत नगर विजापूर रोड दावत होटल सोलापूर - ४१३००४ |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दीष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने मंगळवार दि. २३.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०५/१२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी**
**बँक्स को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर.**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम विशेषतः ता. बार्शी येथील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविणेत येते की, डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील जागा गट नं. ८९९/१/क याचे एकुण क्षेत्रफळ ९२ आर. ही जागा मयत उत्रेश्वर मारुती जाधव यांची खरेदी मालकीची होती व आहे. उत्रेश्वर जाधव हे दि. ११/११/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर जागेचे हक्कपत्रकी मयत उत्रेश्वर मारुती जाधव यांचेच नावाची नोंद आहे. सदर जागेचे सरस-निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी आमचे अशिल म्हणजेच उत्रेश्वर जाधव यांचा नातु लखोजी अनंत जाधव यांनी बार्शी येथील सि. ज. ज्यु. डि. यांचे कोर्टात रे.मु. नं. १३/२०२५ दाखल केला होता व आहे. मयत उत्रेश्वर जाधव यांची पत्नी शांताबाई उत्रेश्वर जाधव ही दि. ०८/११/२००६ रोजी मयत झालेली आहे. मयत उत्रेश्वर व शांताबाई यांना त्यांची मुले नामे अनंत, अशोक, निर्मला, रेखा, पार्वती होती, त्यापैकी अनंत जाधव हे मयत झालेले आहेत, त्यांची पत्नी शालन ही देखील सन २०१७ मध्ये मयत झालेली आहे. मयत अनंत व शालन यांना त्यांची मुले लखोजी व अश्विनी असे वारस आहेत. तसेच मयत अशोक यांना त्यांची पत्नी शारदा व मुले रेश्मा, राधा, धनाजी, राहुल असे वारस आहेत आणि मयत उत्रेश्वर जाधव यांच्या मुली निर्मला काळे, रेखा कवडे, पार्वती पवार या हयात आहेत. या वारसांव्यतिरीक्त मयत उत्रेश्वर जाधव यांना इतर कोणतेही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत.

तरी, या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, मयत उत्रेश्वर जाधव यांना वर नमुद वारसांव्यतिरीक्त इतर कोणी कायदेशीर वारस असतील तर, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आत खालील नमुद पत्त्यावर संपर्क साधावा किंवा मे. कोर्टात हजर राहुन हरकत नोंदवावी.

कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ०६/१२/२०२५.

**अशिल**
**श्री. लखोजी अनंत जाधव**

**सही/-**
**श्री. संतोष गोपीनाथ गायकवाड,**
ॲडव्होकेट
**उपळाई रोड, चव्हाण प्लॉट, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि.अ.नं. ५३/२०२५
पुढील नेमली ता. ६/१/२०२६
नि. ६

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठस्तर यांचे न्यायालयात**

संघप्रिया अमोल वाघमारे, वय ११ वर्ष
धंदा-शिक्षण, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर-अज्ञान
अ.पा.क. वर्षा महादेव नागटिळक, वय ३९ वर्षे, **--अर्जदार**
धंदा-घरकाम, सिध्दार्थनगर, वैराग, ता. बार्शी,
जि. सोलापूर (अज्ञान अर्जदाराची आत्या म्हणून)

**विरुध्द**

१) शौर्या अमोल वाघमारे, वय ०४ वर्षे,
धंदा-नाही, रा. वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर-अज्ञान
२) कल्पना धर्मराज पाटणे, वय ३६ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. सोलापूर रोड, वैराग, **--सा.वाला**
ता. बार्शी, जि. सोलापूर (स्वतः करीता व अज्ञान
सा.वाली नं.१ ची अ.पा.क. म्हणून

ज्याअर्थी अर्जदार व सा.वाली नं.१ या सावत्र बहिणी आहेत. अर्जदाराचे वडिल अमोल किशोर वाघमारे हे होते त्यांचे पहिले लग्न अर्जदाराची आई रेश्मा उर्फ राधिका हिचेबरोबर झालेले होते सदर विवाह संबंधातून अर्जदार हिचा जन्म झाला आहे. अर्जदाराचे वडिल व आई रेश्मा यांचेमध्ये पुढे घटस्फोट झाला आणि अर्जदाराचे वडिलानी सा.वाली नं.२ बरोबर विवाह केला सदर विवाह संबंधातून अर्जदाराचे वडिलाना सा.वाली नं.१ ही मुलगी झाली अशाप्रकारे अर्जदार व सा.वाली नं.१ या सावत्र बहिणी आहेत पुढे अर्जदाराचे वडिल अमोल किशोर वाघमारे हे दि. २१/१०/२०२२ रोजी बार्शी येथे मयत झाले त्यांचे पश्चात अर्जात मिळकतीस नांव नोंद होणेकरीता विनंती केली असता सा.वाली नं.२ ने नकार दिला असे कथन करुन अर्जदाराने ती मयत अमोल किशोर वाघमारे यांची कायदेशीर वारस असलेबाबत हेअरशिप वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरणा आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः ५/१२/२०२५

**सही/-**
**वरिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

**शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, बार्शी**

# शेतजमिनी, पिके, घरे वाहून गेल्यानंतर मदत मागणं गुन्हा आहे का?

**● माजी खासदार राजू शेट्टी यांचा सवाल**
**● ...हा राज्य सरकारचा बेजबाबदारपणा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

शेतजमिनी, पिके, घरे वाहून गेल्यानंतर मदत मागणं गुन्हा आहे का? असा सवाल माजी खासदार राजू शेट्टी यांनी जुळे सोलापुरातील जामगुंडी मंगल कार्यालय येथे आयोजित केलेल्या पत्रपरिषदेत उपस्थित केला. यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या कामांच्या तक्रारींचा चांगलाच पाढा वाचला.

केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लोकसभेत महाराष्ट्रातून अतिवृष्टीचा प्रस्तावच आला नाही, असे म्हटले आहे. जर का त्यांनी दिशाभूल करणार वक्तव्य केलं असेल तर त्यांच्यावर हक्कभंग लागू शकतो. सोलापूरमध्ये ११० पैकी ९९ सर्कलमध्ये अतिवृष्टीची नोंद, तरीही प्रस्ताव गेला नाही हा राज्य सरकारचा बेजबाबदारपणा आहे. एनडीआरएफचा निधी कोणाच्या बापाचा नाही, शेतकऱ्यांचा हक्काचा आहे. केंद्राने निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पंजाब आणि बिहारला भरघोस मदत दिल्यामुळे निधी संपला असावा किंवा केंद्राने महाराष्ट्रावर दबाव आणला असावा. केंद्र की राज्य कोण दिशाभूल करतंय? याचा खुलासा करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.



बिले देऊ न शकल्याने चार ठेकेदारांनी आत्महत्या केल्या आहेत. राज्य सरकारने गेल्या ३ ते ४ वर्षांपासून रोजगार हमी योजना, विहीर, पाणंद रस्ते केले. मात्र मजुरांची बिले थकवली, शेतकऱ्यांना ठिबक सिंचनचे अनुदान दिले नाही. फडणवीस सरकारच्या एक वर्षाची ही उपलब्धता म्हणावी लागेल, असे खोचक विधानही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेत शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, तानाजी बागल, मोहसिन पटेल, इक्बाल मुजावर, पप्पू पाटील, सचिन मस्के आदी उपस्थित होते.

### टीईटी परीक्षा द्यायला अवधी द्यावा

राज्य सरकारने टीईटी परीक्षा द्यायला अवधी द्यावा. जे शिक्षक रिटायर व्हायला आले आहेत ते आता कसली परीक्षा देणार? त्यांचा अनुभव हेच त्यांचे शिक्षण समजले पाहिजे. एवढी वर्ष काम करत असतील तर त्यांना पुन्हा परीक्षा घ्या, पुन्हा सेवेत घेऊ हे म्हणणे चुकीचे आहे, असेही त्यांनी प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

### शेतकऱ्याना जीएसटी हा शून्य असला पाहिजे

जीएसटी कमी केल्याचा गाजावाजा करण्यात आला. मुळातच शेतकऱ्यांना कीटक नाशके, बियाणे यांसह शेतीसाठीचे विविध साहित्य घेण्यासाठी जीएसटी भरावा लागतो. शेतकऱ्यांकडून उत्पादित झालेल्या मालाला जरी जीएसटी लागत नसला तरी १२ टक्के जीएसटीचा बोजा हा शेतकऱ्यांवरच पडतो, असेही ते म्हणाले.

### कारखान्याच्या गव्हाणे बंद करणार

कोल्हापूर, सांगली, सातारा येथील कारखान्यांनी कमीत कमी ३४०० आणि जास्तीत जास्त ३६५३ एवढी पहिली एफआरपी दिली आहे. याउलट सोलापूरच्या साखर कारखानदारांनी तोंड उघडले नाही. यावर्षी उसाचा उत्पादन कमी आहे. दोन दिवस शांत बसू अन्यथा एकेक कारखान्याचे गव्हाणे बंद करण्यास आम्ही सुरुवात करू, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# सोलापूरच्या प्रश्नांविषयी सोमवारी नागपूर येथे बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

सोलापूरच्या विविध समस्या व प्रश्नांची सोडवणूक करण्यासंदर्भात सोमवार, दि.८ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता विधानसभेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोलापूर सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या नागपूर येथील निवासस्थानी बैठक बोलावली आहे. या बैठकीला सोलापूर शहरातील सर्वपक्षीय नेते, प्रशासकीय अधिकारी आणि माध्यम प्रतिनिधी यांना आमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादीचे शहर संतोष पवार यांनी दिली.

विधानसभेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी नुकताच तीन दिवसांचा सोलापूर दौरा केला आहे. या दौऱ्यामध्ये सोलापूर शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पिण्याचे पाणी, बेरोजगारी, आयटी पार्क, रस्ते, वीज तसेच रोजंदारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न आदींची निवेदने दिली होती. यावर चर्चा करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक लावणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. या बैठकीस खा.प्रणिती शिंदे, आ.विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे यांच्यासह सुधीर खरटमल, जुबेर बागवान, किसन जाधव, आनंद चंदनशिवे, तौफिक शेख, गणेश पुजारी, आनंद मुस्तारे, अमोल शिंदे, चेतन नरोटे, प्रवीण डोंगरे, महेश धाराशिवकर, प्रताप चव्हाण, अशोक जानराव, बबलू गायकवाड, शौकत पठाण, सुनीता रोटे, तुकाराम गायकवाड, शशिकांत टाकळीकर, राजू राठी, अतुल नागटिळक, लखन भंडारे आदींना आमंत्रित करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

# आज कांदा बाजारपेठ राहणार बंद

**असंख्य माथाडी कामगार चैत्यभूमीकडे रवाना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

भारतरत्न, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांदा बाजारपेठ एक दिवसासाठी बंद ठेवण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी कांदा सोलापूर बाजार समितीमध्ये विक्रीस आणू नये, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, असंख्य माथाडी कामगार चैत्यभूमी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दर्शनासाठी जात रवाना झाले आहेत. त्यामुळे बाजार समितीत माथाडी कामगारांची संख्या कमी होते. कमी कामगारांच्या संख्येत कांदा बाजारपेठे व्यापार सुरळीत होणार नाही. ही बाब लक्षात घेता, दि.६ डिसेंबर रोजी कांदा बाजार पेठ बंद ठेवण्यासाठी बाजार समिती प्रशासनाकडे निवेदन सादर केले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.



# 'वालचंद'च्या अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजुषामध्ये ५०० हून अधिक स्पर्धकांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

श्री ऐल्लक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचालित भगवान महावीर अध्ययन केंद्र व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने अहिंसा तत्त्वज्ञान प्रश्नमंजुषा२०२५ या १८ व्या वार्षिक स्पर्धेचे आयोजन ६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या प्रशस्त सभागृहात करण्यात आले आहे.

श्रध्देय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त आध्यात्मिक परंपरा, अहिंसेचे तत्त्वज्ञान आणि ज्ञानसंवर्धनाची परंपरा जपण्यासाठी अधिक प्रयत्न केल्याने यावर्षी विशेष उपक्रमात ११८ संघांतील सुमारे ५०० हून अधिक स्पर्धकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला आहे. सामूहिक प्रयत्नातून उभ्या राहिलेल्या या ज्ञानमहोत्सवाला महाराष्ट्र व कर्नाटकातील शालेय, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय व खुल्या गटातील स्पर्धकांनी उत्कृष्ट प्रतिसाद दिला आहे. वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स तसेच कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या संस्थांनी या उपक्रमासाठी अथक परिश्रम केले आहेत. ''शिक्षण हाच धर्म'' या अहिंसा तत्त्वज्ञानाशी सुसंगत विचारातून संपूर्ण कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.




उद्घाटन समारंभास कर्नाटकातील रबकवी येथील जैन तत्त्वज्ञान अभ्यासक व साधिका डॉ. त्रिशला नाडगौडा-पाटील उपस्थित राहणार आहेत. त्या जैन आगम, अहिंसा, आत्मशुद्धी आणि आजच्या काळातील तत्त्वज्ञानाचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी असणार आहेत.

विविध पिढ्यांना एकत्र आणत, मूल्याधिष्ठित शिक्षणाची जपणूक करणारा हा उपक्रम संपूर्ण समाजासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेचे निकाल जाहीर करून विजेत्यांना सन्मानित करणारा समारोप समारंभ दुपारी १.३० वाजता होणार आहे. या वेळी मुख्य अतिथी म्हणून डॉ. सरिता कोठाडिया उपस्थित राहतील आणि त्या अहिंसा साधना, मननचिंतन व मूल्याधारित शिक्षणाविषयी मार्गदर्शन करतील. शालेय विद्यार्थी, तरुणांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्व पिढ्यांचा मिळालेला प्रतिसाद आणि अहिंसाअनेकांतवादाच्या शिकवणीवर आधारित प्रश्नमंजुषेमुळे सोलापूरातील अहिंसा प्रेमी समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्व. भाऊसाहेब गांधी जन्मशताब्दी वर्षाच्या संकल्पनेनुसार ''श्रद्धा, ज्ञान आणि सेवा'' या तीन आधारस्तंभांवर कार्यक्रमाचे भक्कम स्वरूप उभे राहिले आहे.

# व्यापाऱ्यांच्या बंदमुळे कामगारांवर उपासमार

**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध घटकांना बाजार समिती परस्परपूरक आहेत. मात्र व्यापाऱ्यांनी पुकारलेला एक दिवसाचा लाक्षणिक बंद गुरुवारी कामगारांसाठी उपासमारीचा दिवस ठरला आहे. व्यापाऱ्यांनी आपल्या हेतूसाठी हा बंद पुकारला. परंतु त्यावर अवलंबून असणाऱ्या अनेक कामगारांचा विचार केला नाही. हातावरचे पोट असणाऱ्या कामगारांसाठी अशा परिस्थितीत दिवस काढणे अत्यंत कठीण आहे. असा नाराजीचा सूर बाजार समितीमध्ये कार्यरत असणाऱ्या विविध कामगार संघटनांनी व्यक्त केला.

दरम्यान, भुसार व अडत व्यापारी संघटनेच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी पुकारलेला एक दिवसाचा लाक्षणिक बंद यशस्वी झाला. बाजार समिती मधील भुसार व अडत व्यापारी विभाग पूर्णतः बंद होता. किराणा, भुसार, मसाला, ऑइल मिल, डाळमिल असे विविध विभाग या बंद सहभागी होते. परंतु, या विभागात कार्यरत असणाऱ्या समारोह हजारो कामगारांवर उपासमारीची कुराड कोसळली. एक दिवसाची हजेरी यामुळे कामगारांची बुडाली. यापरिस्थितीत कामगारांसाठी कोण मदतीचा हात देणार? असा प्रश्न आता कामगार संघटनांमधून उपस्थित केला जात आहे. कामगार कायद्याप्रमाणे कामगारांना त्यांच्या कामाचे मोबदला देणे बंधनकारक आहे. परंतु अशा बंद आणि संपच्या काळामध्ये कामगारांची मोठी उपासमार होते. त्यावेळी प्रशासन किंवा बाजार समिती याकडे दुर्लक्ष करते. अशा परिस्थितीत शासनाने योग्य निर्णय घ्यावा. अशी मागणी देखील मातोश्री रमाबाई आंबेडकर माथाडी कामगार संघटनेकडून केली जात आहे.



# ह.दे.प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडा महोत्सवास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

येथील हरिभाई देवकरण प्रशाला कनिष्ठ महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवास सुरुवात झाली. याचे उद्घाटन जिल्हा कोषागार कार्यालय अधिकारी वैभव राऊत व शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते फुगे सोडून झाले.

यावेळी उपमुख्ध्यायापक रविंद्र पानसरे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार उपस्थित होते. सुरुवातीस आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडूकडून क्रीडा ज्योत आणून स्वागत व पूजन झाले. कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्याध्यक्ष चंद्रकांत जाधव यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांचा परिचय रत्नाकर लोंढे यांनी करुन दिला. एन.सी.सी मुले, मुली व आर.एस.पी. यांची संचलने झाली. तालीयोगा, कराटे, दांडपट्टा, संगीत कवायत आदी प्रात्यक्षिके सादर झाली.

विद्यार्थ्यांनी प्रतिनिधी अनुष्का देशमुख हिने क्रीडा प्रतिज्ञा दिली. प्रमुख पाहुणे राऊत यांनी व्यायामाचे व खेळाचे महत्त्व पटवून दिले. उपमुख्याध्यापक पानसरे यांनी खिलाडी वृत्ती कशी जोपासावी हे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद चुंगे यांनी केले. जयश्री बोळकवठेकर यांनी आभार मानले.

# 'बीजीएस'च्या प्लास्टिक सर्जरी शिबिरास सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ डिसेंबर-**

भारतीय जैन संघटना, राऊंड टेबल आणि छत्रपती शिवाजी महाराज शासकीय वैद्यकीय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. महेंद्र शहा व स्व. डॉ. शरदकुमार दीक्षित यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्लास्टिक सर्जरी शिबिरास सुरवात झाली. अमेरिकेतील तज्ञ डॉ. राज लाला, रुग्णालय अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, डॉ. सचिन जाधव, डॉ. सचिन स्वामी, डॉ. अर्गजा चिटणीस, डॉ. तोडकर, बीजेएसचे राज्याध्यक्ष केतन शहा, सचिव संतोष बंब, सदस्य श्याम पाटील, राऊंड टेबलचे चेअरमन आशिष तापडिया, सचिव अभिषेक झंवर, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभुते, जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे आदी उपस्थित होते.

# सार्वजनिक शौचालय पाडले; चार जणांवर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

महापालिकेच्या शौचालयाची जागा हडपण्यासाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च करून बांधलेले १० सीट शौचालय जेसीबीने फोडून ती जागा हडपल्याचा प्रकार महापालिका प्रशासनाच्या निदर्शनास आला. यामुळे एकच खळबळ उडाली. याप्रकरणी महापालिका आरोग्य निरीक्षकाने दिलेल्या तक्रारीवरून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी महापालिका घनकचरा विभागातील आरोग्य निरीक्षक विश्वास लमुवेल क्षीरसागर (वय- ४५, रा. सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिसांनी नागेश शिवलिंगप्पा कोरे, काशिनाथ कुंभार (दोघे राहणार- अंबिका नगर भाग- ५ सोलापूर) आणि जेसीबी मशीन चालक आणि मालक अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले. शहरातील कुमठा नाका आणि नई जिंदगी परिसरातमधील अंबिका नगर भाग- ५ येथे पालिकेचे सार्वजनिक शौचालय आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने लाखो रुपये खर्च केलेले आहे. या ठिकाणची देखरेख ही फिर्यादी झोन क्रमांक ४ मधील महापालिका आरोग्य निरीक्षक विश्वास क्षीरसागर हे करत असतात. दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी सकाळी ६ ते दुपारी २ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेप्रमाणे कर्तव्य बजावल्यानंतर कुमठा नाका परिसरातील अंबिका नगर भाग ५ मधील महापालिकेच्या जागेवरील सार्वजनिक शौचालयातील महिलांसाठी चे ५ सीट आणि पुरुषांसाठीचे ५ सीट असे एकूण दहा सीट सौचालय आरोपींनी दुपारी ४ ते सायंकाळी ५ वाजण्याच्या दरम्यान जेसीबी लावून पाडून टाकण्यात आले. तसेच जेसीबीच्या माध्यमातून या परिसरातील संपूर्ण महापालिकेची जागा बळकावण्याच्या उद्देशाने आरोपी नागेश शिवलिंगप्पा कोरे आणि काशिनाथ कुंभार आणि त्याच्या साथीदारांनी परवानगीशिवाय सार्वजनिक शौचालय साठी घेतलेले ड्रेनेज लाईन आणि सेफ्टी टँक पर्यंत जाणारे संपूर्ण परिसर खोदून काढून उध्वस्त केले. या पद्धतीने त्यांनी शासकीय मालमत्तेचे तसेच महापालिका प्रशासनाचे सुमारे ७ लाख रुपयांचे नुकसान केले.

महापालिकेचे विभागीय कार्यालयातील कनिष्ठ अभियंता महेंद्र बोटे यांनी आरोग्य निरीक्षक क्षीरसागर यांना कळविले. याची माहिती मिळताच येऊन पाहिले असता आरोपींनी संगणमत करून महापालिकेच्या शौचालयाची जागा हडपण्यासाठी जेसीबीच्या माध्यमातून संपूर्ण सार्वजनिक शौचालय पाडून टाकल्याचे निदर्शनास आले यानंतर त्यांनी वरिष्ठांना याची माहिती दिली. मिळालेल्या निर्देशानुसार त्यांनी अखेर एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून आपली सविस्तर फिर्याद दाखल केली. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र प्रसाद वाघमारे हे करीत आहेत.



# रिंग टेनिस स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयास उपविजेतेपद

**सोलापूर :** शहर रिंग टेनिस (टेनिक्कॉईट) स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांनी उपविजेतेपद संपादिले. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे, सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले. **उपविजेता संघ :** यश जाधव, युग जाधव, सोहम जानराव, सोहम गायकवाड, अरहान इनामदार, कृष्णा कांबळे.

# वेदमंत्राहून आम्हा वंद्य 'वंदे मातरम'ची कहाणी उजेडात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ डिसेंबर-**

प्रिसिजन फाउंडेशनतर्फे आयोजित प्रिसिजन वाचन अभियानात ''कहाणी वंदे मातरम् ची'' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. लेखक मिलिंद प्रभाकर सबनीस यांची मुलाखत पत्रकार सिद्धाराम पाटील यांनी घेतली.

वंदे मातरमचा १५० वर्षांचा प्रवास, गीतामागील इतिहास, दंतकथा आणि त्याचे राष्ट्रभावनेशी नाते यावर हा संवाद रंगला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लेखक मिलिंद सबनीस आणि मुलाखतकार सिद्धाराम पाटील यांचा प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी ओमप्रकाश बारड यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. दुर्मिळ धर्मग्रंथ, आध्यात्मिक साहित्य आणि प्राचीन वस्तू जपून ठेवण्याचे कार्य त्यांनी अनेक वर्षे केले असून, आजही त्यांनी तो वारसा लोकांसाठी खुला ठेवला आहे.



मिलिंद सबनीस यांनी सांगितले की, त्यांनी गेली ३० वर्षे 'वंदे मातरम्' या गीताचा सखोल अभ्यास केला आहे. दिवाळी अंक बंद करून, पूर्ण वेळ या विषयाचा शोध घेतला. वंदे मातरम् गीताच्या निर्मितीविषयी अनेक दंतकथा प्रचलित असून, १८७५ साली नैहाटी येथे हे गीत लिहिले गेल्याचा उल्लेख ते करतात.

'आनंदमठ' ही कादंबरी अध्यात्म आणि राष्ट्रभावनेची सांगड घालणारी ही रचना आहे. रविंद्रनाथ टागोर यांनी १८९६ च्या कलकत्ता अधिवेशनात प्रथमच हे गीत सार्वजनिकरित्या गायले होते, ही ऐतिहासिक नोंदही त्यांनी उपस्थितांसमोर मांडली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे व्यासपीठावर फडकणारा तिरंगा आणि उपस्थितांचा देशभक्तिपर सहभाग. विशेषत: जे. जे. कुलकर्णी आणि डॉ. सुहासिनी शहा यांनी केलेली देशभक्तीपर वेशभूषा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होती.

यावेळी ''जण मन गण पितृगीत, आणि वंदे मातरम मातृगीत!'' असा भावपूर्ण संदर्भ देत सबनीस यांनी वंदे मातरमच्या आदरस्थानाबद्दल मनोगत व्यक्त केले. तसेच 'आनंदमठ' या कादंबरीची मराठी आवृत्ती लवकरच सोलापूरात प्रकाशित होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

प्रिसिजन वाचन अभियानाच्या माध्यमातून देशभक्ती, साहित्य आणि इतिहासाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हेतू साधणारा हा कार्यक्रम प्रेक्षकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सफल ठरला. प्रसाद जिरांगलगीकर यांनी गायलेल्या संपूर्ण वंदे मातरमने या कार्यक्रमाचा समारोप झाला. प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## ७० वर्षीय वृद्धेवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीला जामीन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

भूम तालुक्यातील पाटसांगवी शिवारातील दुधना नदी परिसरात ७० वर्षीय वृद्धेवरील अत्याचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या रमेश हरिदास नायकिन याला जामीन मंजूर करण्यात आला आहे. हे प्रकरण जिल्हा व सत्र न्यायालय, भुम यांच्या अधिकारक्षेत्रातील न्यायमूर्ती बी. जी. धर्माधिकारी यांच्या कोर्टात चालू आहे.

फिर्यादी अजिनाथ रंगनाथ खिंडकर यांनी दिलेल्या फिर्यादी अनुसार ही घटना २० जुलै २०२५ रोजी घडली होती. यासंदर्भातील एफआयआर ३० जुलै २०२५ रोजी रात्री ११.१७ वाजता भुम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी तपास एस.एफ. मुल्ला यांनी केला. सुनावणीत बचाव पक्षाचे वकील ॲड. अतिक शेख यांनी एफआयआर दाखल करण्यात झालेला उशीर, पीडितेच्या निवेदनातील विसंगती, घटनास्थळावरून मिळालेल्या पुराव्यांचा अभाव तसेच वैद्यकीय अहवालात गंभीर जखमा नसल्याचे मुद्दे मांडले.

या सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने आरोपीवरचे आरोप सिद्ध होत नसल्याचे नमूद करत आरोपी रमेश नायकिन यांना जामीन मंजूर केला.

## संक्षिप्त वृत्त...



### राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) जिल्हा सचिवपदी सुहास ठोंगे

**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या धाराशिव जिल्हा सचिव पदी हिंगणगाव (बु.), ता. परंडा येथील सुहास ठोंगे यांची निवड करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या मान्यतेनंतर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या हस्ते ठोंगे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. पक्ष संघटनेत युवकांना संधी देण्याच्या धोरणांतर्गत परंडा तालुका युवक अध्यक्षपदी प्रवीण गरड तर युवक तालुका उपाध्यक्षपदी शिवाजी गायकवाड यांची निवड घोषित करण्यात आली. निमित्त प्रसंगी धाराशिव नगरपरिषदेचे संभाव्य नगराध्यक्ष खलिफा भाई कुरेशी, युवक जिल्हाध्यक्ष शेखर घोडके, रोहित बागल, अर्चना अंबुरे, बालाजी गायकवाड, लक्ष्मण गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



### जगदीश सुतारची राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेसाठी निवड

**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रिडा परिषद व जिल्हा क्रिडा कार्यालय नांदेड, मेरा भारत व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या विभाग स्तरीय चित्रकला स्पर्धेत जगदीश सुतार यांची धाराशिवचे प्रतिनिधित्व करत विभागातून द्वितीय क्रमांक पटकावत राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात सुतार यांचे अभियांत्रिकी शिक्षण चालू असून प्राचार्य डॉ. विक्रमसिंग माने व समन्वयक डॉ. सुशीलकुमार होळंबे, संस्थेचे अध्यक्ष पद्मसिंह पाटील, विश्वस्त आ. राणाजगजीतसिंह पाटील, मल्हार पाटील व ट्रस्टचे व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे यांनी महाविद्यालयाच्या यशस्वी प्रतिनिधित्वसाठी सुतारचे अभिनंदन व कौतुक केले.

### धाराशिव एमआयडीसी परिसरातून युनिकॉर्न मोटरसायकल चोरी

**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

आनंदनगर पोलीस ठाणे हद्दीत एमआयडीसी धाराशिव परिसरातील हॉटेल किग्रसमोर उभी ठेवलेली एक



मोटरसायकल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी सज्जन श्रीराम मते (वय २६, रा. दहिफळ ता. कळंब, जि. धाराशिव; ह.मु. हॉटेल किग्र, एमआयडीसी, धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांची होंडा युनिकॉर्न (क्र.एमएच-२५ बीडी ०९३१) मोटरसायकल, अंदाजे ३०,००० किम्मतीची, ही २९ नोव्हेंबर रोजी सायं. ७ ते ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ या वेळेत हॉटेल किग्रच्या जिन्याजवळून अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. याप्रकरणी ४ डिसेंबर रोजी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### दिव्यांग दिनानिमित्त दिव्यांगाचा सत्कार

**कळंब, दि.५ डिसेंबर -**

दिव्यांगात्वर जिद्दीने व मात करीत उत्साहाने आपली सेवा सातत्य असलेले दिव्यांग बंधुंचा सत्कार दिव्यांग दिनानिमित्त करण्यात आला. यामध्ये राज हजारे, अशोक कुलकर्णी, गणेश शिंदे यांचा शाल पुष्पहार देऊन महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ, पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल माने, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, व्याख्याते महादेव खराटे, माधवसिंग राजपूत, मुख्याध्यापक बाबासाहेब कांबळे यांनी सत्कार केला. यावेळी दिव्यांग दिनानिमित्त त्यांच्या कार्यास शुभेच्छा व्यक्त केल्या.

## जिल्ह्यात महायुती सरकारच्या एका वर्षात हजारो कोटींची विकासकामे : दत्ताभाऊ कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

महायुती सरकारच्या एका वर्षात धाराशिव जिल्ह्यात अभूतपूर्व प्रमाणात निधी मंजूर होऊन विविध विकासकामांना गती मिळाली असल्याचे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या यशाबद्दल त्यांनी सरकारच्या नेतृत्वाचे आभार मानले. या पत्रकार परिषदेस ॲड. दत्तात्रय देवळकर, ॲड. नितीन भोसले हे उपस्थित होते.

कृष्णा-मराठवाडा प्रादेशिक सिंचन प्रकल्पासाठी ११,७०० कोटींची प्रशासकीय मान्यता मिळाली असून प्रकल्पाचा थेट फायदा मराठवाड्याच्या जल हक्कांना होणार आहे. रामदाराचे एकुर्गा टप्पा क्रमांक सहाचे काम सुरू होऊन ७,००० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल. तसेच निम्नतीरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीसाठी ११३ कोटी, कुरनूर योजनेसाठी २९.६५ कोटी मंजूर झाले आहेत.

तुळजापूरला जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास १,८६५ कोटी मंजूर



झाले आहेत. भूसंपादनासाठी ५०० कोटींची तरतूद केली असून काम सुरू आहे. तुळजापूरला राष्ट्रीय रेल्वे नकाशावर स्थान देण्यासाठी प्रकल्पाला ३,२९५ कोटींची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली असून खर्चातील ५०% राज्य हिस्सा मंजूर झाला आहे. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गालगत सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि अत्याधुनिक वैद्यकीय संकुलासाठी ३१ एकर जागेचा ताबा घेण्यात आला असून पहिल्या टप्प्यातील कामांसाठी ४३० कोटी मंजूर झाले आहेत. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या ५०० बेड क्षमतेच्या नवीन इमारतीसाठी २३० कोटी, तसेच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील आधुनिक शस्त्रक्रिया कक्षासाठी ३९.५० कोटी मिळाले आहेत. कौडगाव एमआयडीसीमध्ये २५० कोटींच्या गुंतवणुकीतून ५० मेगावॅट सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी २४ कोटींच्या पायाभूत सुविधांची कामे प्रगत आहेत, ज्यातून सुमारे १० हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. पीएमएजीपी आणि सीएमएजीपीच्या माध्यमातून जिल्ह्यात १,८०० नवे उद्योग उभारण्यात आले आहेत.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत ९ लाख ७६ हजार शेतकऱ्यांना १,२७८ कोटी मदत वितरित करण्यात आली आहे. संजय गांधी निराधार व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेतील ९ हजारांहून अधिक लाभार्थ्यांचे केवायसी त्यांच्या घरी जाऊन पूर्ण करण्यात आले.

दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले की, या सर्व प्रकल्पांमुळे धाराशिव जिल्ह्याचा सर्वांगीण विकास जलद गतीने सुरू असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्यासह महायुती सरकारच्या सहकार्याबद्दल जिल्हावासियांच्या वतीने आभार व्यक्त केले आहेत.

## आर्थिक अडचणीचे कारण सांगत १० लाखांची खंडणी

**खंडणी न दिल्यास कुटुंबीयांना जिवे मारण्याची धमकी...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

परंडा शहरातील शिक्षक सोसायटी परिसरातील दोन जणांवर १० लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी व जिवे मारण्याची धमकी दिल्याबद्दल परंडा पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, आरोपी अमर दयानंद तिवारी, आनंद दयानंद तिवारी (दोघे रा. शिक्षक सोसायटी, परंडा, जि. धाराशिव) दिपक द्वारकाप्रसाद तिवारी (वय ६९ वर्षे, रा. सर्वे नं. ४५, कुर्डवाडी रोड, परंडा) फिर्यादींच्या तक्रारीनुसार, दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ७.३० वाजता, आरोपींनी वेळोवेळी फोन करून 'आम्ही आर्थिक अडचणीत आहोत' असे सांगत १०,००,००० रुपये खंडणी मागितली. ही रक्कम न दिल्यास फिर्यादींच्या मुलगा, मुलगी व सुनेला जिवे मारण्याची धमकी आरोपींनी दिली.

**परंडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल...**

या तक्रारीवरून दि.४ डिसेंबर रोजी परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

## जुगारविरोधी कारवाईत ५ जण पोलिसांच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.५ डिसेंबर -**

लोहारा पोलीसांनी ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.२८ वाजता कास्ती बु गावातील जुने समाज मंदिराजवळ छापा टाकून ५ जणांना





तिरट मटका जुगार करताना पकडले. आरोपींकडून एकूण १,६८० रुपये रक्कम जुगारसाहित्यासह जप्त करण्यात आली.

पोलिसांनी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा नुसार गुन्हा नोंदवला असून याप्रकरणी अधिक तपास लोहारा पोलिस करीत आहेत.

## राष्ट्रीय महामार्गावर चोरट्यांचा धुमाकूळ

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ डिसेंबर -**

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग परिसरात काही दिवसांपासून चोरट्यांचा वाढता धुमाकूळ पाहता गुन्हे आटोक्यात आणण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर वाशी पोलिस ठाण्याचे निरीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महामार्ग परिसरात विशेष तपास मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेदरम्यान दि.४ डिसेंबर रोजी पोहे बोरकर, वारे, शेळके आणि सय्यद यांच्या पथकाने वाशी फाटा परिसरात गस्त घालत असताना चार संशयित एकाच मोटारसायकलवर आपली ओळख लपवून फिरताना आढळले. पोलिसांनी तात्काळ पाठलाग करून एमएच-४५-एम-४१३२ क्रमांकाची मोटारसायकल आणि त्यावरील दोघांना ताब्यात घेतले.

**चोरीस गेलेली मोटारसायकल जप्त**

पोलिस चौकशीत ही मोटारसायकल कुर्डुवाडी (ता. माढा, जि. सोलापूर) येथून चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले. वाशी पोलिसांनी मोटारसायकल जप्त करून पुढील तपास सुरू केला असून सतर्क गस्तीमुळे संभाव्य गंभीर गुन्हा रोखण्यात यश आल्याचे पोलिसांनी सांगितले.

## ३.१९ लाखांचे साहित्य चोरी; अज्ञातावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यातील शिवाजीनगर, सांजा बायपास रोड परिसरात ३ लाख १९ हजार रुपयांचे साहित्य चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे.



फिर्यादी सारीका भाऊसाहेब बेलुरे (वय ४०, रा. शिवाजी नगर, सांजा बायपास रोड, धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या ठिकाणाहून ऑक्सीजन वॉल ३५ नग, कॉपर-झिंक फ्लेक्झिबल नोजल बोल्ट, इनरशेट ४० नग, आरटींग कॉपर पट्टी, तसेच १३ मीटर पाईप असे एकूण ३,१९,००० किंमतीचे साहित्य २६ नोव्हेंबर रोजी ९ ते १ डिसेंबर रोजी रात्री ९ या कालावधीत अज्ञात व्यक्तीने चोरून नेले. या फिर्यादीवरून ४ डिसेंबर रोजी धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास सुरू आहे.

## आलियाबाद हिंदू स्मशानभूमीत लाईट नसल्याने नागरिक त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.५ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील आलियाबाद हिंदू स्मशानभूमी अनेक वर्षांपासून अंधारात असून, रात्री अंत्यविधी करणे नागरिकांसाठी मोठे संकट बनले आहे. स्मशानभूमीतच नव्हे तर तिकडे जाणाऱ्या रस्त्यावरसुद्धा दिव्यांची व्यवस्था नसल्याने मृतांच्या कुटुंबीयांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संतप्त नागरिकांनी नगरपालिकेकडे तात्काळ प्रकाशव्यवस्था आणि स्वच्छतेची मागणी केली आहे.

शहरापासून सुमारे २ किलोमीटर अंतरावर असलेली ही स्मशानभूमी व्यासनगर, व्यंकटेशनगर, रामलीलानगर, भवानीनगर आणि इंदिरानगर या भागातील नागरिकांसाठी आणखी दूर आहे. महत्वपूर्ण म्हणजे येथे अनेक वर्षांपासून एकही स्ट्रीटलाईट नसल्याने रात्री अंत्यविधीसाठी येणाऱ्या लोकांना अंधारात काम करावे लागते.

**तात्काळ सोयींची मागणी**

स्मशानभूमीत काटेरी झुडपे, गवत, आणि घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, परिसर पूर्णपणे दुर्लक्षित असल्याचे चित्र आहे. शहरातील विविध चौकांमध्ये चार-चार बल्ब बसविणारे नगरपालिका प्रशासनच स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी लक्ष देत नसल्याची नागरिकांची खंत आहे.

नागरिकांनी मागणी केली आहे की आलियाबाद स्मशानभूमीत तात्काळ प्रकाशव्यवस्था करावी, परिसरातील स्वच्छता करून काटेरी झुडपे व गवत काढावे, स्मशानभूमीचा पूर्ण परिसर सुरक्षित व स्वच्छ ठेवण्यासाठी कायमस्वरूपी देखभालव्यवस्था उभी करावी.

२१ डिसेंबरनंतर नगरपालिकेचे नवे कारभारी पदभार स्वीकारणार असून, त्यांनीही स्मशानभूमीच्या दुरवस्थेकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे.

## पन्नालाल सुराणा यांच्या निधनाने समाजकारण व राजकारणात मोठी पोकळी : प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

पाणलोट क्षेत्रातील विकास, एकल महिला, निराधार मुले यांच्यासाठी आयुष्यभर सातत्याने संघर्ष करत समाजवादी विचारसरणीचे निरलस जीवन जगणारे जेष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा (भाऊ) यांचे निधन झाले. धाराशिव जिल्ह्यातील भूकंपग्रस्त भागातील मुलांसाठी त्यांनी बांधलेल्या 'आपलं घर' संस्थेत त्यांनी अखेरचा श्वास घेतला.



सामाजिक क्षेत्रातील प्रत्येकासाठी ते फक्त 'भाऊ' म्हणूनच परिचित होते.

भाऊंचे जाणे म्हणजे सामाजिक कार्यक्षेत्रातील मोठी पोकळी निर्माण होणे, अशी भावना विविध स्तरांतून व्यक्त केली जात आहे.

भाऊंचा प्रवास साधेपणाचा आणि काटकसरीचा होता. राज्य परिवहन महामंडळाच्या साध्या बसनेच ते नेहमी प्रवास करीत. निराधार, अनाथ, वंचितांच्या कल्याणासाठी ते आयुष्यभर सक्रिय राहिले. समाजवादी पक्ष, जनता पक्ष, पुरोगामी चळवळी तसेच जन आंदोलनालय उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण करताना म्हटले की, समाजकारण आणि राजकारणातील आदर्श व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

## 'भैरवनाथ'च्या गाळप; पहिली उचल २८०० रुपये जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ डिसेंबर -**

सोनारी येथील भैरवनाथ शुगर कारखान्याच्या २०२५-२६ गाळप हंगामातील कामकाजाला चांगला वेग मिळाला असून आजअखेर एकूण १,५१,४४५ मे.टन ऊसाचे गाळप पूर्ण झाल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन अनिल सावंत यांनी दिली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस गाळपाअभावी शिल्लक राहणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कारखान्याचे संस्थापक व परंडा मतदारसंघाचे आमदार डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच चेअरमन अनिल सावंत व व्हाईस चेअरमन विक्रांत सावंत यांच्या नियोजनातून गाळप सुरळीत सुरू असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांच्या



हिताचा विचार करत या हंगामातील पहिली उचल प्रती मे.टन २८०० रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा चेअरमन अनिल सावंत यांनी केली.

भैरवनाथ शुगरने सदैव एफआरपीपेक्षा अधिक दर देण्याचा पायंडा पाडला असून यंदाही शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला मिळेल, असा विश्वास सावंत यांनी व्यक्त केला. यासोबतच शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचा परिपक्व ऊस गाळपासाठी कारखान्याकडे पाठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### अभाविपचे ७१ वे राष्ट्रीय अधिवेशन देहरादूनमध्ये संपन्न...

## राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यपदी डॉ. प्रितिश नाईकनवरे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.५ डिसेंबर -**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (अभाविप) ७१ वे राष्ट्रीय अधिवेशन उत्तराखंडची राजधानी देहरादून येथे मोठ्या उत्साहात पार पडले. देशभरातून हजारो पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित असलेल्या या अधिवेशनात संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले.



या अधिवेशनात धाराशिव जिल्ह्यातील ढोराळा येथील रहिवासी डॉ. प्रितिश रामदास नाईकनवरे यांची अभाविप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड जाहीर झाली. सध्या ते इंटर्न चइइड डॉक्टर म्हणून कार्यरत असून २०२० पासून विद्यार्थी परिषदेशी सक्रियपणे जोडलेले आहेत. मागील चार वर्षांपासून त्यांनी नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी समाजासाठी अभाविपच्या माध्यमातून विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन केले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक उत्तरदायित्व रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य अभाविप करत आहे, असे मत डॉ. नाईकनवरे यांनी यावेळी व्यक्त केले.

अधिवेशनाचे उद्घाटन भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (ISRO) अध्यक्ष एस. सोमनाथ यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान, संशोधन आणि नवोन्मेषाच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले.

## छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अतिक्रमण, अस्वच्छतेचे साम्राज्य

**शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ डिसेंबर -**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती, धाराशिवतर्फे आज शुक्रवार, दि. ५ डिसेंबर रोजी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळा परिसरात वाढलेल्या अतिक्रमण, अस्वच्छता आणि वाहतूक कोंडीच्या समस्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी समितीने केली आहे.

समितीने निवेदनात नमूद केले आहे की, पुतळा परिसरात अनधिकृत फळगाड्या, खाद्य स्टॉल, प्रवासी रिक्षांची गर्दी यामुळे परिसर नकोसा झालेला असून कचरा टाकल्याने अस्वच्छता व दुर्गंधी वाढली आहे. गर्दीच्या वेळी मद्यप्राशन केलेल्या काही व्यक्तींकडून होणाऱ्या लघुशंका व घाण करण्याच्या घटना वारंवार दिसत असल्याचेही समितीने निदर्शनास आणून दिले.

याशिवाय, पुतळा परिसरात मोठ्या प्रमाणात लावण्यात येणारे डिजिटल बोर्ड यामुळे परिसराचे सौंदर्य बाधित होत असून पुतळ्याची नियमित स्वच्छता न केल्याने शिवभक्तांच्या भावना दुखावल्या जात आहेत, असेही निवेदनात म्हटले आहे.

पुतळा परिसरात २४ तासांसाठी नगरपरिषदेचे दोन कर्मचारी नियुक्त करणे, सर्व अतिक्रमण तात्काळ हटवणे, पुतळा परिसराचे रुंदीकरण, परिसरात डिजिटल बोर्ड लावण्यास बंदी, पुतळ्याच्या संरक्षणासाठी २४ तास पोलीस बंदोबस्त नियुक्त करणे समितीने वरील मागण्या तातडीने अंमलात आणाव्यात, अशी मागणी केली



आहे. शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या परिसरात काहीही अघटीत घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील. मागण्या न मानल्यास समिती तीव्र आंदोलन करेल, असा इशारा समितीने दिला.

यावेळी समितीचे उपाध्यक्ष हनुमंत यादव, सचिव आकाश भोसले, शहराध्यक्ष संतोष घोरपडे, हनुमंत तांबे, व्यंकटेश पडिले, अमोल साळुंके, रामानंद माडेकर, विशाल पवार, बालाजी क्षीरसागर, योगेश आतकरे, ॲड. जयप्रकाश साळुंके तसेच समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# धवल क्रांती पुरस्काराने १२ आदर्श दूध उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मान

## माफसूचे माजी संचालक डॉ. अनिल भिकानेंच्या वाढदिवसानिमित्त विशेष गौरव सोहळा

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, ५ डिसेंबर :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी विस्तार शिक्षण संचालक तथा पशुपालक शेतकऱ्यांचे मार्गदर्शक डॉ. अनिल भिकाने यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्ह्यातील १२ आदर्श दुध उत्पादक शेतकऱ्यांचा धवल क्रांती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. हा महत्वाकांक्षी व प्रेरणादायी सोहळा करडखेल, तालुका उदगीर येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदगीर तालुक्याचे माजी आमदार व ज्येष्ठ शेतकरी नेते शिवराज तोंडचिरकर हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लातूर कृषी महाविद्यालयाचे अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे, लातूर जिल्हा दूध संघाचे व्यवस्थापक श्री. रामराव बिरादार, राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विश्वनाथ मुडपे व करडखेलचे उपसरपंच गिरीश राघू यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

पशुपालक शेतकरी हा केंद्रबिंदू मानून संपूर्ण आयुष्य शेतकरी व पशुपालकांसाठी निस्पृह भावनेने समर्पित करणारे, संशोधन,




शिक्षण व विस्तार कार्याच्या माध्यमातून हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणारे ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. अनिल भिकाने यांचा यावेळी मान्यवरांनी गौरव केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक शेतकरी आधुनिक पशुपालन व दुग्ध व्यवसायाकडे वळले असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमात दुध उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे लातूर जिल्ह्यातील सतपाल रेड्डी (उजेड), विष्णू कोळगीर (चोंडी), नविद अलिखान (अहमदपूर) राजपाल बिराजदार (नेकनाळ), संतोष पाटील (तोडांर), राहुल रक्षाळे (लोहारा), प्रविण घुगे (कुमठा) गणेश मातनकर (करडखेल), वैभव वाडकर (डिगोळ), परमेश्वर नरहारे (तिवटग्याळ), गणेश गुरमे (हेर), राम गंगापुरे (कबनसांगवी) आदी १२ आदर्श दुध उत्पादक शेतकऱ्यांचा सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन लक्ष्मी दूध उत्पादक सहकारी संस्था, करडखेल यांच्या वतीने करण्यात आले असून ज्ञानेश्वर कंजे यांनी या उपक्रमाचे प्रमुख संयोजक म्हणून पुढाकार घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वनाथ मुडपे, बहारदार सुत्रसंचालन कुणाल घुंगार्डे, प्रक्षेत्र व्यवस्थापक एम एसडी निमल हेल्थ तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर कंजे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओकांर मेडिकलचे महादेव सुर्यवंशी यानी परिश्रम घेतले.

यावेळी जिव्हाळा ग्रुपचे विश्र्वनाथराव बिरादार, अमृतराव देशपांडे, माजी सरपंच दिलीप निडवंचे, कृष्णाथ जाधव, राहूल उगीले, ज्ञानोबा गुरमेसह मोठ्या संख्येने शेतकरी, दुग्ध उत्पादक, पशुपालक, सहकारी संस्था पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोटरी क्लबने फुलवला दिव्यांगणांच्या जीवनात आनंद

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, ५ डिसेंबर :** रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई आणि रोटरी क्लब अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींकरिता मोफत कृत्रिम पाय बसवण्याचे शिबिराचे आयोजन रेड्डी हॉस्पिटल येथे करण्यात आले. दिव्यांग बांधवांना स्वावलंबी आणि सक्षम जीवन जगण्यासाठी मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिराचे उद्घाटन अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे डायरेक्टर मुरली भुतडा उपस्थित होते. व्यासपीठावर रोटरी क्लब अहमदपूरचे अध्यक्ष कपिल बिरादार, डॉ. वैभव रेड्डी, माजी अध्यक्ष राजीव कल्याणे, महेंद्र खंडागळे, अॅड. भारत चामे, प्रा. शिवशंकर पाटील, गोपाल पटेल, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर अनिल चवळे, दिलीप आरदवाड, मनोज आरदवाड, श्रीराम कलमे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

ऑनलाईन नोंदणी ५५



लाभार्थ्यांनी केली होती, त्यापैकी ३७ दिव्यांगांनी प्रत्यक्ष येऊन मोजमाप करून घेतले. ज्यांचा पाय अपघातामुळे किंवा इतर कारणांनी गमावला आहे अशांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे बनवलेले कृत्रिम पाय बसविण्यात आले असून रोटरीच्या माध्यमातून अहमदपूरमध्येच ही सुविधा पुरवली आहे. यापूर्वी मोजमाप घेतलेल्या ३१ लाभार्थ्यांना निशुल्क कृत्रिम पाय बसविण्यात आले. रत्ननिधी ट्रस्ट तर्फे मनोज चव्हाण व अदनान शेख यांनी पाय बसविण्याचे कार्य पार पाडले.

या शिबिरासाठी रेड्डी हॉस्पिटल उपलब्ध करून देत सहकार्य करणाऱ्या डॉ. वैभव रेड्डी यांचे विशेष योगदान राहिले. लाभार्थी आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. संपूर्ण नियोजनात रोटरी सदस्य व हॉस्पिटल कर्मचारी, रत्न निधी चॅरिटेबल ट्रस्टचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष कपिल बिरादार यांनी केले सूत्रसंचालन अनिल चवळे यांनी तर आभार गोपाल पटेल यांनी मांडले.

# चापोली येथील दत्त जयंती उत्सवाला मुख्यमंत्र्यांचे शुभेच्छापत्र

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, ५ डिसेंबर :** चाकूर तालुक्यातील चापोली येथील रामगिरी महाराज मठ देवस्थान येथे दि.०४ नोव्हेंबर रोजी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दत्त जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या उत्सवानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष शुभेच्छापत्र देऊन भाविकांना मंगलमय शुभेच्छा दिल्या.यावरून मुख्यमंत्री फडणवीस यांचे चापोली वासियांवर असलेले विशेष प्रेम अधोरेखित करण्याजोगे आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पाठवलेल्या शुभेच्छापत्रात दत्तात्रेयांच्या उपासनेतून ज्ञान, करुणा आणि कर्तव्यनिष्ठा यांचे मूल्य समाजाला दिशा देतात असे नमूद केले आहे. चापोलीतील उत्सव हा श्रध्दा, संस्कार आणि सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. या शुभेच्छापत्राचा स्वीकार रमेश पाटील (जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा) यांनी केला. यावेळी बोलताना रमेश पाटील म्हणाले,चापोली मठाचा दत्त जयंती उत्सव हा आमच्या भागाची ओळख आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शुभेच्छा हा आमच्यासाठी सन्मान असून भाविकांमध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या आहेत.

स्थानिक ग्रामस्थ, भाविक आणि उत्सव समितीने मुख्यमंत्री फडणवीस यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले असून संपूर्ण परिसरात उत्सवाचे धार्मिक वातावरण आणि आनंदाची भावना पाहायला मिळत आहे.

# आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, ५ डिसेंबर :** विळेगाव केंद्रांतर्गत दिनांक४.१२.२०२५ गुरुवार या दिवशी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये माध्यमिक गटामधून प्रथम क्रमांक पटकावलेला आहे. त्यामध्ये हुले साक्षी, उमेश हाडबे, निवडघे समर्थ, बोरुळे श्रावणी, पतंगे क्षितिज, तुरेवाले सुशांत या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.तसेच प्राथमिक गटामधून द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे.

त्यामध्ये सपकाळे प्रांजली, साईप्रसाद नळ गिरे, बिरादार वैष्णवी, गवळी तेजस्विनी, संस्कृती वानोळे, महादेवी खांडेकर या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच या विज्ञान प्रदर्शनामध्ये शिक्षकांनी सुद्धा सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये प्राथमिक गटातून पवार उमाकांत व नाजमीन आत्तार यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर माध्यमिक गटातून माने शुभांगी व तारीख भट यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून प्राथमिक गटामधून कांबळे ज्योती यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. यांचे संस्थाध्यक्ष गोविंदराव भोपणीकर व संस्था सचिव गजानन भोपणीकर यांच्या वतीने



विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

